रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । वर्ष ८९। अंक २२४ । पृष्ठे ८ ▌MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६

किंमत ४ ₹

## राज्यात थंडीचा जोर ओसरला

**मुंबई :** महाराष्ट्र सध्या तीव्र थंडीच्या लाटेतून वाचला असला, तरी हवामानातील अस्थिरतेमुळे नवं संकट उभं राहण्याची शक्यता आहे. हवामान विभागानुसार, पुढील तीन दिवस राज्यात थंडीचा प्रभाव कमी राहणार असून, त्यानंतर तापमानात पुन्हा घट होऊन थंडी वाढण्याचा अंदाज आहे. सध्या राज्यातील बहुतांश भागांत सकाळी आणि रात्री गारवा, तर दुपारी उष्णतेचा त्रास जाणवत आहे. कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्र आणि विदर्भात हवामान प्रामुख्याने निरभ्र राहणार असून, काही भागांत सकाळी धुक्याची शक्यता हवामान विभागाकडून वर्तविण्यात आली आहे.

# लोकशाही वाचवण्यासाठी गद्दारांना गाडा

**। चौल । प्रतिनिधी ।**

जे गद्दार आहेत, ते बाहेरचे नाहीत. आपल्यातीलच आहेत. लोकशाही जिवंत ठेवायची असेल, तर या गद्दारांना हद्दपार करावेच लागेल, असा थेट इशारा देत शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी चौल जिल्हा परिषद मतदारसंघातून राजकीय रणशिंग फुंकले. शेतकरी कामगार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि काँग्रेस महाविकास आघाडीची जिल्हा परिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील पहिली सभा रविवारी (दि.१८) चौल-तुलाडदेवी येथे पार पडली. यावेळी जयंत पाटील बोलत होते. सुरेंद्र म्हात्रे हे फक्त शिवसेनेचे उमेदवार नाहीत. ते शेतकरी कामगार पक्षाचे आणि काँग्रेसचेही उमेदवार आहेत. प्रत्येकाने तसेच समजून काम करावे. त्यांना प्रचंड मतांनी निवडून देण्याचे आवाहन जयंत पाटील यांनी उपस्थितांना केले. यावेळी प्रचंड मोठ्या संख्येने महाविकास आघाडीचे कार्यकर्ते उपस्थित होते.



## चौलमधून जयंत पाटील कडाडले; सुरेंद्र म्हात्रेंना विक्रमी मताधिक्क्याने निवडून देण्याचे आवाहन

रायगड जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचा बिगुल वाजताच चौल मतदारसंघात राजकीय वातावरण तापले असून, महाविकास आघाडीविरोधात काम करणाऱ्या गद्दारांवर जयंत पाटील यांनी उघड हल्लाबोल केला. "जे गद्दार आहेत, ते बाहेरचे नाहीत, आपल्यातीलच आहेत. आम्हालाही कळले नाही की कोण कधी बाजू बदलून बसला," असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना सावध केले.

महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे यांनी घेतलेल्या सर्वपक्षीय आढावा बैठकीने संपूर्ण रायगड जिल्ह्याचे लक्ष वेधून घेतले. या बैठकीला जनतेची तोबा गर्दी पाहायला मिळाली.

या बैठकीस शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील, शिवसेना उबाठाचे जिल्हाध्यक्ष तथा चौल जिल्हा परिषद मतदार संघाचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे, चौल-वरंडे पंचायत समिती उमेदवार अनया अमित फुंडे, काँग्रेसचे तालुका अध्यक्ष भास्कर चव्हाण, विजय चौलकर, चौलचे माजी सरपंच मधुकर फुंडे, शेकापचे ज्येष्ठ नेते सुरेश खोत, निलेश खोत, शरयू स्वप्नील अधिकारी, आशिष गोंधळी, महेंद्र पाटील, शिवसेनेचे अशोक नाईक, विनायक म्हात्रे, सूरज म्हात्रे, निलेश म्हात्रे यांच्यासह आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना जयंत पाटील म्हणाले की, चौल विभागात आपल्याला मते पान २ वर

### पैशाचे आमिष दाखवून फोडाफोडीचे राजकारण : सुरेंद्र म्हात्रे

**महाविकास आघाडीचे उमेदवार सुरेंद्र म्हात्रे यांनी विरोधकांवर प्रखर शब्दांत हल्लाबोल केला. खोटी आश्वासने देणे, आधीच झालेली कामे नव्या स्वरूपात दाखवून ग्रामस्थांची दिशाभूल करणे, ३०० कोटींचा निधी आणल्याचे हवेतले दावे करून जनतेला स्वप्ने दाखवणे, असे प्रकार विरोधक सातत्याने करत असल्याचा आरोप त्यांनी केला. पैशांचा महापूर दाखवून फोडाफोडीचे राजकारण, खोटी टेंडरिंग आणि जनतेची फसवणूक सुरू आहे, आणि म्हणूनच ही निवडणूक आपल्या अस्तित्वाची लढाई असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. "ही निवडणूक आपल्याला जिंकलीच पाहिजे" या निर्धाराने प्रत्येक कार्यकर्त्याने कामाला लागावे, असे आवाहनही त्यांनी केले. कोविडसारखी महाभयंकर महामारी, निसर्ग चक्रीवादळ आणि त्यात चौल परिसराचे १०० टक्के नुकसान झाले असताना, चौलचा बागायतदार पूर्णपणे उद्ध्वस्त झाला होता. त्या कठीण काळात आमदार आणि अन्य सत्ताधारी कुठे होते? असा थेट सवाल उपस्थित करत, ती वेळ जनता विसरलेली नाही, अशी घणाघाती टीका सुरेंद्र म्हात्रे यांनी केली.**

## आमदारांचे 'लाल' 'चंदा'चे 'उद्योग' बेकायदेशीर



**तक्रारदाराच्या मागण्या:**

1. बेकायदेशीर सुरू असलेले सर्व उत्खनन तातडीने थांबवण्यात यावे.
2. सक्षम अधिकाऱ्यांमार्फत जमिनीची शासकीय मोजणी करून प्रत्यक्ष स्थितीची तपासणी व्हावी.
3. बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्या आणि पर्यावरणाचे नियम धाब्यावर बसवणाऱ्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी.

### अलिबागमध्ये बनावट कागदपत्रांद्वारे कोट्यवधींचा गौण खनिज घोटाळा?

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील कुरकुंडी-कोलटेंभी परिसरात बनावट कागदपत्रे आणि अधिकारांचा गैरवापर करून बेकायदेशीर माती उत्खनन केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. सचिन जगन्नाथ पाटील यांनी याप्रकरणी जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आणि संबंधित विभागांकडे सविस्तर फौजदारी तक्रार दाखल केली असून, भारतीय न्याय संहिता, २०२३ अंतर्गत कारवाईची मागणी केली आहे. अलिबागच्या आमदारांनी पाळलेले लाल हे भ्रष्टाचाराचे उद्योग करीत असल्याचा तक्रारदाराचा आरोप आहे. तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, पान २ वर

> **अवैधरित्या माती उत्खननाविरोधात सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयात तक्रार करण्यासाठी गेलो असता, मातीमाफिया समीर पाटील यांनी जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला. जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत पाठलाग केला. अखेर जिल्हाधिकारी यांना सांगून पोलिसांच्या सहकार्याने जीव वाचविण्याचा प्रत्न केला. या प्रकरणात माती उत्खनन माझ्या मालकीच्या जागेत करीत आहेत. त्यांच्याविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी.**
>
> **– सचिन पाटील, तक्रारदार**

### बेकायदेशीर उत्खननाचा आरोप

कूरकुंडी-कोलटेंभी येथील गट क्र. १७८/२, ११७, ११९, १६४ आणि १७९ या क्षेत्रांतून कोणतीही शासकीय मोजणी न करता आणि रॉयल्टी न भरता मोठ्या प्रमाणावर मातीचे उत्खनन सुरू आहे. संतोष गजानन म्हात्रे, गणेश कडव, समीर गंगाधर पाटील व आशिष गंगाधर पाटील, संजय राजकुमार पाटील, दिलीप नंदकुमार पाटील यांनी संचिन पाटील यांच्या जागेतून उत्खनन केल्याचा आरोप सचिन पाटील यांनी केला आहे.

शिकूया AI ची क्रांती, चला करूया

MS-CIT

आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कॉम्प्युटर कोर्स

mscit.mkcl.org

प्रवेशासाठी आजच MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.

## वेध|क

### नितीन नवीन भाजपचे अध्यक्ष

**नवी दिल्ली :** भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी अखेर नितीन नवीन यांची निवड करण्यात आली आहे. भाजपाकडून १६ जानेवारीपासून राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडीसाठी कार्यक्रम सुरू झाला होता, त्यानुसार आज अर्ज नामांकनप्राप्त आणि पाठिंब्याच्या जोरावर नितीन नबीन ३७ सेटसह भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष बनले आहेत. यापूर्वी त्यांना भाजपचे कार्यकारी अध्यक्ष बनविण्यात आले होते. या निवडीसाठी भाजपचे जवळपास सर्व मुख्यमंत्री, राज्य युनिट प्रमुख आणि वरिष्ठ नेते उपस्थित होते. भाजपने१४ डिसेंबर २०२५ रोजी नितीन यांची पक्षाचे कार्यकारी अध्यक्ष म्हणून नियुक्ती केली होती.

### निवडणुका बॅलेटवर घेण्याचा निर्णय

**बंगळुरू :** कर्नाटक राज्य निवडणूक आयोगाने २५ मेनंतर होणाऱ्या बंगळुरू येथील स्थानिक संस्थांच्या निवडणुकीत इलेक्ट्रॉनिक व्होटिंग मशीनऐवजी बॅलेट पेपर वापरण्याचा निर्णय घेतला आहे. ग्रेटर बंगळुरू एरिया स्थानिक संस्थेच्या निवडणुकीत बॅलेट पेपरवर मतदान पार पडणार आहे. कर्नाटकचे मुख्य निवडणूक अधिकारी जी.एस संगरेशी यांनी ही घोषणा केली. येत्या मे-जून महिन्यात याठिकाणी निवडणूक लागणार आहे. या वर्षीच्या अखेरीस होणाऱ्या जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकाही बॅलेट पेपरने घेतल्या जातील, असे जी.एस. संगरेशी यांनी सांगितले.

### 'जनतेचा आवाज दाबण्याचा प्रयत्न'

**नवी दिल्ली :** केरळमधील कोच्ची येथे आयोजित काँग्रेसच्या महापंचायतीत राहुल गांधी यांनी भारतीय जनता पक्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर तीव्र टीका केली. राहुल गांधी म्हणाले की, भाजप आणि आरएसएस सत्तेचे केंद्रीकरण करण्याचा प्रयत्न करत आहेत, तर काँग्रेस पक्षाचा मूलभूत विचार सत्तेच्या विकेंद्रीकरणावर आधारित आहे. भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार लोकांचा आवाज दाबून काही मोजक्या कॉर्पोरेट घराण्यांना फायदा करून देत आहे. भाजपला देशातील लोकांनी शांत राहावे असे वाटते आणि केवळ निवडक कॉर्पोरेट घराण्यांनी प्रगती करावीत, अशी त्यांची भूमिका असल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला.

## हळदी समारंभात वधूसह ५० जणांना विषबाधा

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

कल्याणमधील हायप्रोफाईल मोहन प्राईड इमारतीमध्ये हळदी सभारंभात जेवण केल्याने ४० ते ५० लोकांना विषबाधा झाल्याची घटना सोमवार, दि. १९ जानेवारी रोजी घडली आहे. हळदी समारंभातील या धक्कादायक घटनेमुळे सर्वत्र खळबळ माजली आहे. पाहुण्यांना विषबाधा झाल्यानं लग्नच रद्द करण्यात आले आहे. याप्रकरणी वधूसह आई, बहीण यांनादेखील ही विषबाधा झाली आहे. या घटनेमुळं वधूला जबर मानसिक धक्का बसला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, कल्याणमधील हायप्रोफाईल मोहन प्राईड इमारतीमध्ये हळदी सभारंभाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात जेवण केल्यानं ४० ते ५० लोकांना विषबाधा झाल्यानं खळबळ उडाली आहे. यामध्ये वधूलादेखील विषबाधा झाली आहे. या घटनेमुळं लग्न रद्द करण्यात आलं आहे. संबंधित केटर्सवर गुन्हा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचे गांभीर्य लक्षात घेत कल्याण खडकपाडा पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. ज्या खाण्यातून विषबाधा झाली आहे, त्या अन्नाचे नमुने नसल्याने पोलीस अधिक चौकशी करून कारवाई करणार असल्याची माहिती कल्याण खडकपाडा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अमरनाथ वाघमोडे यांनी दिली आहे. या गंभीर घटनेमुळे लग्नाच्या आनंदावर विरजण पडले आहे. दोन कुटुंबं एकत्र येण्याआधीच दुर्दैवी घटना घडल्यामुळे शोक व्यक्त करण्यात येत असून, पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### लग्न झालं रद्द, कल्याणमध्ये खळबळ

## आज महाविकास आघाडीतर्फे उमेदवारी अर्ज भरणार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषद सात व पंचायत समिती १४ मतदारसंघांतील शेतकरी कामगार पक्षासह महाविकास आघाडीचे उमेदवार उद्या मंगळवारी (दि.२०) उमेदवारी अर्ज अलिबागचे उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक अधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करणार आहेत.

रायगड जिल्हा परिषद ५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी निवडणूक होणार आहे. अलिबाग तालुक्यामध्ये शहापूर, आंबेपूर, आवास, थळ, चेंढरे, चौल व कावीर असे सात जिल्हा परिषद गट तसेच वैजाळी, शहापूर, आंबेपूर, रुईशेत भोमोली, आवास, किहीम, थळ, वरसोली, चेंढरे, आक्षी, रेवदंडा, चौल, काविर, रामराज असे १४ पंचायत समिती गण आहेत.

जिल्हा परिषद गटातील शहापूर, आवास, चौल या ठिकाणी सर्वसाधारण आरक्षण आहे. आंबेपूर, थळ येथे सर्वसाधारण महिला, कावीर येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग व चेंढरे येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिलांसाठी आरक्षण आहे. तसेच अलिबाग पंचायत समिती गणातील वैजाळी, शहापूर, आंबेपूर, आक्षी, कावीर येथे सर्वसाधारण आरक्षण आहे. किहीम, चेंढरे, पान २ वर

### जिल्ह्यात २२ अर्ज दाखल

रायगड जिल्हा परिषदेच्या ५९ व पंचायत समितीच्या ११८ जागांसाठी उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली आहे. आजपर्यंत २३ अर्ज दाखल झाले असून, त्यात जिल्हा परिषदेच्या जागांसाठी ११ व पंचायत समितीच्या सदस्यपदाच्या जागांसाठी ११ अर्ज दाखल झाल्याची माहिती देण्यात आली आहे. त्यात अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या जागांसाठी एकूण आठ अर्ज दाखल झाल्याचे सांगण्यात आले आहे.

अलिबाग तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या सात आणि पंचायत समितीच्या १४ जागांसाठी निवडणूक होणार आहे. शनिवारी एक अर्ज दाखल झाला होता. त्यानंतर सोमवारी जि.प. व पं.स.च्या वेगवेगळ्या मतदारसंघातील उमेदवारांनी अर्ज दाखल केले. एका दिवशी एकूण सात अर्ज दाखल करण्यात आले. आजपर्यंत जि.प. सदस्यपदासाठी सहा आणि पं.स. सदस्यपदासाठी दोन असे एकूण आठ अर्ज दाखल झाले आहेत. उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत २१ जानेवारीपर्यंत आहे. त्यामुळे आता फक्त दोनच दिवस शिल्लक राहिले आहेत.

## ज्येष्ठ छायाचित्रकार वामन पाटील यांचे निधन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**



अलिबागमधील ज्येष्ठ प्रसिध्द छायाचित्रकार वामन पाटील यांचे वृद्धापकाळाने सोमवारी (दि. १९) निधन झाले. निधनसमयी ते ८९ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुले, सुना व नातवंडे असा परिवार आहे. वामन पाटील हे एक नखशिखांत कलाकार होते. वामन दामोदर पाटील हे मूळचे अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथील रहिवासी होते. ते सुरुवातीला कोकण एज्युकेशन सोसायटीच्या मुख्य कार्यालयात अकाऊंटंट होते. वाचन, लेखन व छायाचित्र काढण्याची त्यांना आवड होती. त्यामुळे त्यांनी वेगवेगळ्या वृत्तपत्रांत छायाचित्रकार म्हणून काम केले. प्रेमळ व मनमिळाऊ स्वभावाचे असलेले वामन पाटील यांनी पान २ वर

## महापौर आरक्षणाची सोडत २२ जानेवारीला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

राज्यातील २९ महानगर पालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर आता सर्वांचे लक्ष शहराचा प्रथम नागरिक कोण होणार, याकडे लागले आहे. या पार्श्वभूमीवर, राज्यातील २९ महानगर पालिकांमधील महापौरपदाच्या आरक्षणाची अधिकृत सोडत गुरुवार, २२ जानेवारी रोजी मंत्रालयात काढली जाणार आहे.

नगर विकास विभागाच्या पत्रानुसार, ही सोडत राज्याच्या नगर विकास राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली पार पडणार आहे. मंत्रालयातील सहाव्या मजल्यावरील परिषद सभागृहात सकाळी ११ वाजल्यापासून या प्रक्रियेला सुरुवात होईल. या सोडतीद्वारे अनुसूचित जाती (एससी), अनुसूचित जमाती (एसटी), इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) आणि महिलांसाठीचे महापौरपद निश्चित केले जाणार आहे.

मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, संभाजीनगर यांसारख्या मोठ्या शहरांसह राज्यातील २९ महापालिकांमध्ये आरक्षणाची ही सोडत अत्यंत महत्त्वाची मानली जात आहे. आरक्षण कोणत्या प्रवर्गासाठी निघते, यावरच अनेक राजकीय दिग्गजांचे महापौर होण्याचे स्वप्न अवलंबून आहे. जर एखाद्या पालिकेत खुल्या प्रवर्गाचे आरक्षण आले, तर चुरस अधिक वाढण्याची शक्यता आहे. या सोडतीसाठी नगर विकास विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले असून, राज्यमंत्र्यांच्या खासगी सचिवांना या नियोजनाची माहिती देण्यात आली आहे. २२ जानेवारीच्या दुपारपर्यंत राज्यातील २९ शहरांच्या महापौरपदाचे चित्र स्पष्ट होणार आहे.

## 'त्या' पर्यटकाचा मृतदेह आढळला

**। मुरुड । प्रतिनिधी ।**



रायगड जिल्ह्यातील काशीद समुद्रात पुण्याचा पर्यटक बुडून बेपत्ता झाला आहे. दुसऱ्या दिवशीही या पर्यटक सापडला नाही. मुरुड पोलीस घटनास्थळी दाखल होत शोधकार्य सुरू ठेवले आहे. दुसऱ्या दिवशी सोमवार, दि. १९ रोजी सायंकाळी चारच्या सुमारास या पर्यटकाचा मृतदेह हाती लागला.

सोमनाथ राजेश भोसले वय २४ राहणार काळेपडळ, हडपसर, पुणे ( मुळ राहणार शिर्डी , ता. शिर्डी , जि. अहिल्यानगर ) येथून रविवार, दि. १८ जानेवारी रोजी आपल्या मित्रांसह काशीद समुद्रकिनारी आपल्या २६ मित्रमैत्रिणींसह फिरण्यासाठी आला होता. पाण्याचा व लाटांचा अंदाज न आल्याने अचानक सोमनाथ समुद्रामध्ये बेपत्ता झाला. सोबत असलेल्या मित्रांनी आरडाओरडा करत शोध घेण्याचा प्रयत्न केला; परंतु सापडला नाही. याबाबत मुरुड पोलीस ठाण्यात कळविल्यानंतर पोलिसांनी धाव घेत शोधकार्य सुरू केले होते. दुसऱ्या दिवशी सोमनाथचा पान २ वर

**ऐन लग्नसराईत ग्राहकांच्या खिशाला कात्री** | **आजवरचा ऐतिहासिक उच्चांकी दर**

# अबब! चांदीने गाठला तीन लाखांचा टप्पा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सोन्यानंतर आता चांदीही सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेली आहे. आज चांदीच्या दरानं थेट तीन लाख रुपयांचा टप्पा ओलांडत नवा इतिहास रचला आहे. आजवरचा हा सर्वोच्च विक्रमी दर ठरला असून, बाजारात मोठी खळबळ उडाली आहे. ऐन लग्नसराईच्या तोंडावर दागिन्यांची खरेदी करणाऱ्या ग्राहकांना मात्र महागाईचा फटका बसणार आहे. चांदी दरवाढीचे हे



चंदेरी वादळ कुठे जाऊन थांबणार हे सांगणे मुश्किल आहे.

जागतिक पातळीवर डॉलरमधील चढ-उतार, मध्य पूर्वेतील तणाव आणि सुरक्षित गुंतवणुकीकडे वाढता कल याचा थेट परिणाम चांदीच्या किमतींवर दिसून येतोय. त्यातच सौरऊर्जा, इलेक्ट्रॉनिक्स आणि औद्योगिक क्षेत्रातील वाढती मागणीही दरवाढीस कारणीभूत ठरत आहे. लग्नसराईचा हंगाम सुरू असतानाच चांदी महागल्यामुळे ग्राहकांच्या खिशाला फटका, तर गुंतवणूकदार मात्र आनंदी आहेत.

सोन्यापेक्षाही चांदीतून मोठा परतावा पान २ वर

### २०२५ मध्ये १.२१ लाखांची वाढ

चांदीने दरवाढीचा पकडलेला वेग अजूनही कायम आहे. १ जानेवारी २०२५ रोजी चांदीचा दर प्रतिकिलो ८७ हजार ५७८ रुपये इतकी होता. हा दर १८ डिसेंबर २०२५ रोजी प्रतिकिलो २ लाख ९ हजार ९० रुपयांवर पोहोचला. म्हणजेच वर्षभरात चांदीत सुमारे १ लाख २१ हजार ५१२ रुपयांची वाढ झाली आहे. ही वाढ १३७.३४ टक्के इतकी विक्रमी आहे.

> जागतिक स्तरावरील युद्धजन्य स्थिती आणि शेअर बाजारात सातत्याने होणारी घसरण याचादेखील चांदीच्या दरावर परिणाम होत आहे. दोन महिन्यांत दोन लाखांनी चांदीचे दर वाढले आहेत. चांदीचे दर कल्पनेच्या पलीकडे गेलेत, हे खरे असले तरी, खरेदीवर कोणताही परिणाम झालेला नाही. भविष्यातील गुंतवणूक म्हणून ग्राहक चांदी खरेदीकडे पाहात आहेत.
>
> – प्रशांत म्हात्रे, स्टॉक मॅनेजर, वामन हरी पेठे ज्वेलर्स, अलिबाग

## वाढवण बंदराविरोधात जनआक्रोश!

### पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर ऐतिहासिक जनआंदोलन

**। पालघर । प्रतिनिधी ।**

वाढवण बंदर प्रकल्पाविरोधात सोमवार (दि. १९) पालघर जिल्ह्यात तीव्र जनआक्रोश पाहायला मिळाला. पालघर जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर हजारो नागरिकांनी एकत्र येत भव्य आणि ऐतिहासिक जनआंदोलन उभारले. शेतकरी, मच्छिमार, आदिवासी बांधव, पर्यावरणप्रेमी आणि विविध सामाजिक संघटनांचा या आंदोलनात मोठ्या प्रमाणावर सहभाग होता.

वाढवण बंदर प्रकल्पामुळे स्थानिक शेतजमिनी, समुद्रकिनारा, मच्छिमारांची उपजीविका तसेच पर्यावरणाला गंभीर धोका निर्माण होणार असल्याचा आरोप आंदोलकांनी केला. हा प्रकल्प विकासाच्या नावाखाली होणारा विनाश आहे, अशा जोरदार घोषणा आंदोलनस्थळी दिल्या गेल्या. आंदोलकांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करत सरकारने हा प्रकल्प तात्काळ रद्द करावा, अशी ठाम मागणी केली.

स्थानिक ग्रामसभा, लोकप्रतिनिधी आणि विविध संघटनांनी यावेळी एकत्र येत प्रकल्पाविरोधात एकजूट दाखवली. आंदोलन शांततेत पार पडले असून, कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलकांच्या मागण्यांचे निवेदन प्रशासनाला सादर करण्यात आले आहे. वाढवण बंदर प्रकल्पाविरोधातील हा लढा अधिक तीव्र केला जाईल, असा इशाराही यावेळी आंदोलकांनी दिला. आजचे आंदोलन हे या जनलढ्याचे महत्त्वाचे आणि निर्णायक पाऊल मानले जात आहे.

## पान १ वरून

## गद्दारांना गाडा

वाढवायची आहेत. आपली महाविकास आघाडी शेवटपर्यंत टिकवायची आहे. पण, यामध्ये मिठाचा खडा टाकणारे कोण आहेत, हे शोधण्याची जबाबदारी आमची आणि तुम्हा कार्यकर्त्यांचीही आहे. अलिबाग तालुक्यातील आमदारांच्या कामगिरीवर टीका करत जयंत पाटील म्हणाले की, पूर्वी अलिबागचे आमदार विधिमंडळात ठामपणे बोलायचे. नाना कुंटे, दत्ता पाटील, ना.का. भगत, मधुकर ठाकूर यांनी तालुक्याचे नाव उंचावले. आजचा आमदार कधी सर्वसामान्यांचे प्रश्न मांडताना दिसतो का? असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. मी एकटा आमदार असतानाही अलिबागचे नाव आणि काम विधिमंडळात कधीही खाली जाऊ दिले नाही, असेही त्यांनी ठामपणे सांगितले.

चौल आणि परिसरातील विकासकामांचा उल्लेख करताना जयंत पाटील म्हणाले की, चौलमधील अनेक रस्ते आणि गल्ल्या सिमेंट काँक्रिटच्या करण्यात आल्या आहेत. नागावपर्यंत पाणी पोहोचवण्यात आले असून, शास्त्रीनगरला मोठी पाण्याची टाकी बांधून चौलला पाणी आणण्याचा निर्धार आहे. रेवदंड्यातही आपल्याला पाणी पोहोचवायचे आहे. ग्रामपंचायत स्तरावरही ही आघाडी टिकली पाहिजे, नाही तर नको तेच लोक सत्तेत येतील, असा इशाराही त्यांनी दिला.

जर आपण घडवलेले लोक आज आपल्या विरोधात काम करत असतील, तर त्याचा बदला आपल्याला मतपेटीतून घ्यायचा आहे, असे सांगत जयंत पाटील यांनी प्रत्येक गावातील प्रत्येक बूथवर जाऊन काम करण्याचे आवाहन कार्यकर्त्यांना केले. शेकापने पनवेल येथे झालेल्या सभेत गद्दारांना ना तिकीट देण्याचा, ना पक्षात स्थान देण्याचा ठराव घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

चौलचा खरा सर्वांगीण विकास शेतकरी कामगार पक्ष, काँग्रेस आणि शिवसेना एकत्र आल्याशिवाय शक्य नाही. उद्याचा विजय हा सुरेंद्र म्हात्रेंचाच विजय असेल. रायगड जिल्ह्यात सर्वाधिक मते त्यांनाच मिळतील, असा ठाम विश्वास व्यक्त करत जयंत पाटील यांनी कार्यकर्त्यांना एकजुटीने आणि जोमाने काम करण्याचे आवाहन केले. चौलमध्ये झालेल्या या आढावा बैठकीने निवडणूक रणधुमाळीला खऱ्या अर्थाने सुरुवात झाली असून, जनतेचा वाढता पाठिंबा पाहता विरोधकांचे आव्हान अधिकच कठीण झाले आहे.

## आमदारांचे 'लाल''चंदा'चे 'उद्योग' बेकायदेशीर

अलिबागचे आमदार ज्याला आश्रय देत आहेत, तोच लाल हे बेकायदेशीर मउद्योगम रेटून नेत आहे. विशेष म्हणजे, 'माती काढणारी माणसे माझीच आहेत. तक्रारदार सचिन पाटील वेडा असून, त्याच्याकडे लक्ष देऊ नका', असे आमदारांनी संबंधित अधिकाऱ्यांना सांगितल्याचा गंभीर दावा तक्रारीत करण्यात आला आहे.

या प्रकारामुळे प्रशासनाची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली असून, लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपामुळे कायदा कुचकामी ठरत आहे का? असा सवाल उपस्थित होत आहे. बेकायदेशीर उत्खननामुळे पर्यावरणाचे म ोठे नुकसान होत असताना, कारवाईऐवजी मसंरक्षणम दिले जात असल्याचा आरोपही जनतेतून होत आहे.

प्रमुख घडामोडी: कागदपत्रांची फेरफार : तक्रारदाराच्या मते, गट क्र. १७८/१ मधून रॉयल्टी दिल्याचे भासवले जात आहे, मात्र प्रत्यक्षात माती त्यांच्या खासगी मालकीच्या जमिनीतून काढली जात आहे. तसेच, शासकीय कागदपत्रांमध्ये बनावटगिरी करून आणि फसवणुकीच्या उद्देशाने दस्तऐवजांचा वापर करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. प्रशासकीय परवानगी आणि वास्तव : कागदपत्रांनुसार, 'मे. स्थानिक युवा कन्स्ट्रक्शन' (प्रो. संतोष गजानन म्हात्रे) यांना २०/०३/२०२५ रोजी स.नं. ११९/१/ब/६ मधून २००० ब्रास म ाती/मुरुम काढण्यासाठी तात्पुरता परवाना देण्यात आला होता. मात्र, या परवान्याचा वापर करून अन्य क्षेत्रांत बेकायदा खोदकाम होत असल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे.

पर्यावरणाची हानी : या अनधिकृत उत्खननामुळे जमिनीचे स्वरूप बदलत असून, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान आणि पर्यावरणाची मोठी हानी होत असल्याकडे पाटील यांनी लक्ष वेधले आहे.

**प्रशासकीय मागणी :**

**सचिन पाटील यांनी आपल्या तक्रारीत म्हटले आहे की, हे उत्खनन तात्काळ थांबवून सक्षम अधिकाऱ्यांमार्फत जमिनीची मोजणी करण्यात यावी. तसेच, पर्यावरणाची हानी करणाऱ्या आणि बेकायदा उत्खनन करणाऱ्या दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. या तक्रारीमुळे महसूल विभागाच्या कार्यपद्धतीवर आणि परवानाधारकांच्या मनमानी कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, प्रशासन आता यावर काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

## आज महाविकास आघाडीतर्फे उमेदवारी अर्ज भरणार

चौल, रामराज येथे सर्वसाधारण महिला, रेवदंडा येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग, वरसोली, आवास येथे नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला, रुईशेत भोमोली येथे अनुसूचित जमाती व थळ येथे अनुसूचित जमाती महिला आरक्षण आहे.

जिल्हा परिषद सात व पंचायत समितीच्या १४ जागांसाठी या मतदार संघामध्ये एकूण दोन लाख एक हजार ९२३ मतदार आहेत. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. शेकाप, महाविकास आघाडीच्या वतीने मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल केले जाणार आहेत. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी महाविकास आघाडीचे उमेदवार अलिबागमधील शेतकरी भवन येथून निघणार आहे. यावेळी शेकाप सरचिटणीस जयंत पाटील, शेकाप ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, द्वारकानाथ नाईक, महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, शेकाप प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप कामगार आघाडी प्रमुख प्रदीप नाईक, तालुका चिटणीस सुरेश घरत आदींसह उमेदवार व कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. थळ मतदारसंघातील शेकापच्या उमेदवार सानिका सुरेश घरत असून, सुशिक्षित व सुसंस्कृत उमेदवार आहेत. त्यांची उमेदवारी रविवारी जाहीर करण्यात आली. शेकाप तालुका चिटणीस सुरेश घरत यांच्या त्या कन्या उमेदवार आहेत. ही लढाई धनशक्ती विरुद्ध जनशक्ती अशी असणार आहे.

## 'त्या' पर्यटकाचा मृतदेह आढळला

मृतदेह सायंकाळी चारच्या सुमारास हाती लागला.

मुरुड पोलीस ठाण्याचे निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक फौजदार गदमले, पोलीस हवालदार दसाडे, पोलीस शिपाई बारवे लाईफ गार्ड व सागर रक्षक दल यांच्या मदतीने शोध घेतला असता सोमनाथचा मृतदेह काशीद बीच येथे सापडला असून, पोलीस पुढील कार्यवाही करीत आहेत.

## अबब! चांदीने गाठला तीन लाखांचा टप्पा

मिळाल्याने, चांदीत ४० टक्क्यांपेक्षा अधिक गुंतवणूक वाढली आहे. एरवी सोन्यापेक्षा चांदीतील गुंतवणूक निम्म्याहून कमी होती. यंदा मात्र, हा आकडा दुप्पट नव्हे, तर तिप्पट झाला आहे. दरवाढीचा विचार केल्यास, चांदीत अवघ्या ११ महिन्यातच १३७ टक्क्यांपेक्षा अधिक वाढ नोंदविली गेली आहे. तुलनेत सोने ४७ टक्क्यांनीच वाढले आहे. आतापर्यंत सोने हे गुंतवणूकीसाठी सर्वात सुरक्षित मानले जात होते. मात्र, त्याची जागा आता चांदीने घेतली आहे. मात्र, असे असले तरी, चांदीत मोठी गुंतवणूक ही धोक्याची ठरू शकते, असे मत तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत.

गेल्या अनेक वर्षापासून चांदीला स्थिर भाव होता. दीड वर्षापासून वाढ होत आहे. जगभरातून चांदीला मागणी वाढली आहे. सौरऊर्जा पॅनलमध्ये चांदीचा वापर, इलेक्ट्रॉनिक गाड्यांमध्ये चांदीचा वापर, आंतरराष्ट्रीय स्तरावर होत असलेली युद्ध या सर्व कारणांमुळे भाव वाढत आहेत. सध्या चोख चांदीमध्ये नागरिक गुंतवणूक मोठ्या प्रमाणात करत आहेत.

## ज्येष्ठ छायाचित्रकार वामन पाटील यांचे निधन

अलिबागसह संपूर्ण रायगड जिल्ह्यात छायाचित्रकार म्हणून स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली. जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने त्यांनी त्यावेळी जिल्ह्यात फोटोग्राफी केली होती. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच सर्व स्तरातून शोक व्यक्त करण्यात आला. अलिबागमधील स्मशानभूमीत त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.


### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक


### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे पळसदरी, ता.कर्जत, जि.रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे पळसदरी, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| महेंद्र पंढरीनाथ शिंदे | ३३ | २/ब | ०-९५-०० या पैकी क्षेत्र ०-४५-०० | ०.२१ |
| | ३३ | ३/ब | ०-०२-०० | ०.०२ |
| | ३३ | ५/ब | ०-०६-०० | ०.०५ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २०/०१/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता: कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं. १, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.: ९५६१५७५६२६/८८८८०९८०८८

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमच्या अशिलांनी मौजे कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील हक्क नोंदीस वर्णन असलेली जमिन मिळकत तिचे मालकांकडून खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| जमिन मालकाचे नाव | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|---|
| पंढरीनाथ लक्ष्मण राणे | ३५ | १ | ०-२६-०० | ०.५९ |

तरी वरील मिळकतीमध्ये इतर कोणत्याही प्रकारचे हक्कहितसंबंध असल्यास व सदर व्यवहार होण्यास कोणाचीही हरकत असल्यास सदर व्यक्तीने आपली लेखी हरकत पूराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा (१४) दिवसांत नोंदवावी. सदर नोटीसीच्या मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहित आहे, असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कर्जत
दिनांक : २०/०१/२०२६

**ॲड. साहिल राजेंद्र निगुडकर**
पत्ता: कोर्ट व्ह्यु को.ऑप. हौ. सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.:९५६१५७५६२६/९५९५३२४२३४

**ॲड. राजेंद्र पी. निगुडकर**
पत्ता: कोर्ट व्यु को.ऑप.हौ.सोसायटी,
शॉप नं.१, कर्जत सिव्हील कोर्ट समोर,
कर्जत रायगड
मो.: ९८२२७७४०७५/८४८४९६५६२६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक योगेश रामचंद्र बोराडे व दिपाली योगेश बोराडे यांचेकडून खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे पाथरज तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|
| १०/१ | एकुण क्षेत्र ०-९१-३० हे आर पॉ | ७-३७ |

या मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयानापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास, तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही, असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक २०/०१/२०२६

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. वृषाली रघुनाथ मोरे**
मोबा. ८५३०१४६८५४
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९, तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर,
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

**खरेदीदारातर्फे वकील ॲड. निलेश कान्हू मोरे**
मोबा. ९८२२६९११०९
ऑफिस पत्ता- शॉप नं.२९. तळ मजला,
हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर
अमराई रोड, कर्जत ता. कर्जत,
जि. रायगड ४१०२०१

### PUBLIC NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**CIN No. U40109MH2005SGC153646**

The following consumer and area covered under 100kV Khopoli Substation in EHV (O&M) Dn., Panvel area affected as, the power supply of the following feeder will be shut down on **Tuesday Dt. 20.01.2026** for Stringing work of HTLS Bottom phase conductor of 220kV Apta-PG-1 line between Loc No. 584 to 584 A. Please co-operate.

| Sr.No. | Substation | | Feeder No. | Date & Time | Areas |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 100/22kV Khopoli Substation | 22kV Bus section-1 | 22KV ACME (HPCL) | On dt. 20.01.2026 From 14:00 Hrs to 16:00 Hrs | M/s HPCL Exp. consumer |
| 2 | | | 22KV KARJAT | | Karjat City area |
| 3 | | | 22KV PAPCO (Khopoli Town) | | Khopoli City residential and commercial area and nearby MIDC and villages |
| 4 | | | 22KV KIDC | | 22kV KIDC Switching Station |
| 5 | | | 22 kV Mulgaon Indus | | Khopoli MIDC area and some Khopoli city area like Mulgaon |
| 6 | | | 22 kV Lauji | | Khopoli MIDC area and some Khopoli city area like Lauji |
| 7 | | | VENUS (Wire Exp) | | M/s VENUS Exp. consumer |
| 8 | | 22kV Bus section-2 | 22kV Khopoli Industrial | | Khopoli MIDC area and some Khopoli city area like wasrang |
| 9 | | | 22kV Shilphata | | Shilphata residential and commercial area and nearby MIDC and villages |
| 10 | | | 22kV Kharsundi | | Khalapur Industrial Area and surronding villages |
| 11 | | | 22kV Sawroli | | 22kV Savroli Switching Station |
| 12 | | | 22kV Rural | | Pali phata and nearby villages |

Sd/-
**Executive Engineer**
**EHV (O&M) DN, Panvel**

**महाराष्ट्र शासन**
**जिल्हाधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग**
**हिराकोट तळ्याजवळ, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड**

दूरध्वनी क्र. ०२१४१-२२४१३१ | फॅक्स क्र. ०२१४१-२२४१३८
ई-मेल :-collector.raigad@maharashtra.gov.in | ई-मेल :-dydeoraigad@gmail.com

क्र/निवडणूक/कार्या ६(२)/मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम/२०२६ | दि. २०/०१/२०२६

**ई-निविदा सुचना क्रमांक ०१/२०२६**

**मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत Enumaration Form व इतर अनुषंगिक साहित्य छपाई करणेबाबत ई निविदा सुचना**

रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघात मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत Enumaration Form व इतर अनुषंगिक नमुन्यांची छपाई करण्यासाठी www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर निविदा प्रसिद्ध करुन ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

**कामाचे नाव:-** रायगड जिल्ह्यातील ७ विधानसभा मतदार संघाच्या मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम २०२६ अंतर्गत Enumaration Form व इतर अनुषंगिक नमुन्यांची छपाई करुन देणेबाबत ई-निविदा.

| | |
|---|---|
| निविदा अंदाजीत रक्कम | रू. ३५,००,०००/- |
| ई निविदा फार्म शुल्क | रू. ५,७००/- (विना परतावा) |
| इसारा/बयाणा (EMD) रक्कम | रू. ९५,०००/- |
| सुरक्षा अनामत रक्कम | रू. १,०५,०००/- |
| ई-निविदा प्रसिद्धीचा दिनांक व वेळ | दि. २०/०१/२०२६ सकाळी १०.०० वाजता |
| ई - निविदा भरण्याचा कालावधी | दि.२०/०१/२०२६ सकाळी १०.०० पासून ते दि.०४/०२/२०२६ सायंकाळी ०४.०० पर्यंत |
| निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) दिनांक वेळ | दि.२७/०१/२०२६ दुपारी १२.०० वाजता |
| ई- निविदा स्विकृतीचा अंतिम दिनांक व वेळ | दि.०४/०२/२०२६ सायंकाळी ०४.०० वाजता |
| ई- निविदा फार्म क्रमांक-१ (तांत्रिक लिफाफा) उघडणेचा दिनांक व वेळ | दि. ०५/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता किंवा तद्नंतर |
| ई-निविदा उघडण्याचे ठिकाण | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग यांचे कार्यालय |
| संपर्क अधिकारी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड-अलिबाग |

**निविदा भरताना सर्वसाधारण आवश्यक बाबी**

१ सदर निविदेच्या अटी व शर्ती www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. निविदा फी व इसारा रक्कम www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरुन त्याची पावती स्कॅन करुन अपलोड करावी. (तांत्रिक निविदेत नमूद केलेली कागदपत्रे PDF मध्ये तयार करुन Briefcase-I मध्ये अपलोड करावीत व दराचा लिफाफा PDF मध्ये तयार करुन Briefcase-II मध्ये अपलोड करावा.)
२ प्राप्त निविदा कारणे न देता नाकारणे अथवा स्विकारण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक रायगड यांनी स्वतः राखून ठेवले आहे. तसेच निविदा अटी व शर्ती अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.
३ सदरची निविदा काम प्राप्त करून देण्याची कोणतीही हमी देत नाही.
४ निविदेत भाग घेण्यासाठी निविदाकारानी क्लास III डीजीटल सिग्नेचर व वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर स्वतः नाव नोंदणी करुन घ्यावी.
५ सदर अटी व शर्तीनुसार नमूद केलेली कागदपत्रे, निविदा खरेदीची पावती ई-निविदेत स्कॅन करुन PDF फॉर्ममध्ये सादर करणे आवश्यक आहे. उपरोक्त कागदपत्रे सादर करणेस कोणतीही वाढीव मुदत अथवा सवलत दिली जाणार नाही.
६ निविदाधारकाने निविदा पूर्व बैठक (Prebid Meeting) ला उपस्थित राहणे आवश्यक आहे. निविदेबाबतची पुर्व बैठक उपरोक्त नमुद दिवशी उपजिल्हा निवडणूक अधिकारी रायगड यांचे दालनात राहील.

सही/-
**जिल्हाधिकारी तथा**
**जिल्हा निवडणूक अधिकारी, रायगड**

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांस या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे चेंढरे, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील नमूद वर्णनाची बिनशेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक सौ.रोहिनी रघुनाथ कुंभार उर्फ पालवणकर व श्री. रोशन घुनाथ कुंभार उर्फ पालवणकर यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून त्या आशयाची बोलणी संदर्भित मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलांदरम्यान झालेली आहेत. खालील नमूद मिळकतीचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र देणेकामी सदर जाहिर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत.

संदर्भित बिनशेती जमीन मिळकत ही पूर्णपणे बिनजोखमी व बोजाविरहित असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीचे विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीमध्ये अन्य कुणाचेही कसल्याही तऱ्हेचा हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १५ दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानीशी देवून माझी खात्री पटवून दयावी. विहीत मुदतीत अशी कोणतेही लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतींचे वैध मालकी हक्क प्रमाणपत्र दिले जाईल, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | गट नं./हिस्सा नं. | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| चेंढरे, ता. अलिबाग, जि. रायगड | ७/६/१२/१/अ/१२/४/४ | २-७८-०० | २७.८० |

अलिबाग,
दि. १९/०१/२०२६

**ॲड. महेश सुहास म्हात्रे**
बी.ए.एल.एल.बी.
रुतुराज प्लाझा, फ्लॅट नं.१
ग्राऊंड फ्लोअर, शिवाजी चौक
गावडे ऑप्टिक्स जवळ
अलिबाग-रायगड ४०२२०१
मो. ०९८५००४२२३४/७७४१०३२२३४

**दि. महाराष्ट्र स्टेट को ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन लिमिटेड**
कनमूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, पो.बॉ.नं. ५०८०,
मस्जीद बंदर - ४००००९
Email ID- manager.statepro@gmail.com

**जाहिर ऑफर सुचना**

विकेंद्रित धान खरेदी योजनेअंतर्गत, पणन हंगाम २०२५-२६ मध्ये किमान आधारभूत किंमत धान खरेदी योजनेअंतर्गत रायगड जिल्ह्यात खरेदी करण्यात येत असलेल्या धानाची, फोर्टीफाईड सीएमआर (FRK) भरडाई करण्यासाठी जिल्ह्यातील स्थानिक इच्छुक मिलधारकांकडून, सिलबंद लिफाफ्यामध्ये ऑफर्स मागविण्यात येत आहेत. सदर धान भरडाईसाठी स्थानिक मिलधारकांनाच प्राधान्य देण्यात येईल. इच्छुक मिलधारकांनी फेडरेशनने प्रस्तावित केलेल्या ऑफर्स फॉर्ममध्ये फक्त फोर्टीफाईड सीएमआर तांदूळ तयार करण्याच्या ऑफर्स द्याव्यात. शासनाच्या निर्देशानुसार भरडाई करावयाच्या धाना संबंधितच्या अटी/शर्ती व कोरे ऑफर्स फॉर्म संबंधित जिल्हा मार्केटिंग अधिकारी यांच्याकडे कार्यालयीन वेळेत प्राप्त होतील. ऑफर्स भरण्याचा कालावधी/कार्यक्रम खालीलप्रमाणे आहे.

अ) ऑफर्स विक्री कालावधी :- दि.२०/०१/२०२६ ते २८/०१/२०२६ (कार्यालयीन वेळेत)
आ) ऑफर्स भरण्याची अंतिम तारीख :- दि.२८/०१/२०२६ दुपारी २.०० वाजेपर्यंत
इ) ऑफर्स उघडण्याची तारीख :- दि.२८/०१/२०२६ दुपारी ३.०० वाजता

**जिल्हा मार्केटिंग अधिकारी**
**रायगड-अलिबाग**

**पत्ता :-** जिल्हा मार्केटिंग अधिकारी कार्यालय,
पत्ता :- बाफना बाग बी, रो हाऊस नं.१४,
बिग फ्लॅश (कोकोनट आयव्ही) हॉटेलच्या मागे,
रेवस रोड, ता.अलिबाग, जि.रायगड
श्री. केशव ताटे
मोबाईल नं. ९१६८०५९९२५
८४०८८६६६१९

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची जमिन मिळकत तिचे मालक १) संजीव चक्रवती २) निशाकर दूबे यांचेकडुन खरेदी करण्याचे ठरविलेले आहे. तिचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मौजे तिवरे तालुका कर्जत जिल्हा रायगड येथील जमिन मिळकत**

| मालकाचे नाव | भूमापन क्रं व उपविभाग / सर्व्हे नं/ हिस्सा नं | क्षेत्र (हे.आर.पॉ) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| १) संजीव चक्रवती<br>२) निशाकर दूबे | १५/४ब | ०-२४-३० | ३-५० |

या मिळकतींशी कोणत्याही अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध, बयाणापावती, खरेदीखत, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीज, कब्जा, लोन, भाडेपट्टा अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास आणि तसेच त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेला असून, त्यांची आमचे अशिलांच्या खरेदी-विक्रीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदी-विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतील जाणार नाही.

ता. २०/०१/२०२६

खरेदीदारातर्फे वकील
**ॲड निलेश कान्हू मोरे मोबा. ९८२२६९११०९**
**ॲड वृषाली रघुनाथ मोरे मोबा. ८५३०१४६८५४**
ऑफिस पत्ता - शॉप नं २९ तळ मजला, हिरापन्ना शॉपिंग प्लाझा बिल्डींग, भारत गॅस समोर अमराई रोड.
कर्जत ता कर्जत, जि. रायगड ४१०२०१

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे कोर्लई, ता. मुरुड, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| १६/१/ब | एकूण क्षेत्र ०-२५-०० हे.आर. | ५.६९ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात घेऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

सही /-
दिनांक :- २०/०१/२०२६
**ॲड. रोहित रो.मानकवळे**
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ताः- हाउस नं.१४१-बी,
हनुमान मंदिर जवळ, मु.पो.कामार्ली,
ता.पेण, जि.रायगड पिन नं.४०२१०७

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, विकास दादाजी पाटील, विवेक विकास पाटील रा.सेक्टर ७ खारघर येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी मालदेव, ता.पेण, जि.रायगड येथे असून मी.स्वतः हर्षकुमार मदनसिंह बजारिया विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे...

| गाव | मालक | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| मालदेव | १.विकास दादाजी पाटील<br>२.विवेक विकास पाटील | २५/९६ | ०.१०.०० | ०.०६ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वताः कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वतः जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक : २०/०१/२०२६
**हर्षकुमार मदनसिंह बजारिया**
ए-५०२/५०३ रिमा टेरेसीस,
चिकूवाडी, गुलमोहर सोसायटी जवळ, शिंपोली,
बोरिवली पश्चिम, मुंबई, महाराष्ट्र, ४०००९२
फोन नंबर : ९७६५०६७१६८

### जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री.रमण विष्णु काळोखे याच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे नालधे, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४/३/अ एकुण १.२९.२० गुंठे पैकी लिहुन देणार यांचे हिश्याचे ०.६९.२० गुठठे क्षेत्र, जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १० दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबध त्यानी आमचे अशिलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : २०/०१/२०२६

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## निवडक




### कृषी समृद्धी योजनेअंतर्गत बैठक

**कर्जत** : शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या गरजेनुरूप संशोधन कार्य सुरू असल्याने देशाच्या अन्न व पोषण सुरक्षेला बळकटी मिळेल, असे प्रशंसोद्गार महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद पुणेच्या महासंचालक वर्षा लड्डा-उंटवाल यांनी काढले. येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या प्रशिक्षण सभागृहात कृषी समृद्धी योजनेंतर्गत विविध पिकातील जलद पैदास संरचना उभारण्या संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीप्रसंगी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेचे संशोधन संचालक डॉ. किशोर शिंदे यांच्यासह डॉ. भरत वाघमोडे, डॉ. अर्चना थोरात, डॉ. प्रीती सोनकांबळे, डॉ. प्रवीण जाधव, डॉ. विजय अमोलिक, डॉ. दीपक पाटील, डॉ. विष्णू गीते, डॉ. गौतम श्यामकुवर, डॉ. मदन वांढरे, डॉ. विजयकुमार चिंचणे, डॉ. विजय सागवेकर व अन्य शास्त्रज्ञ उपस्थित होते. त्या पुढे म्हणाल्या की, शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी मनुष्यबळाचा तुटवडा असूनही शास्त्रज्ञ करीत असलेले प्रयत्न वाखाणण्याजोगे असल्याने महाराष्ट्रातील चारही कृषी विद्यापीठांना आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून त्यांच्या बळकटीकरणासाठी प्रामाणिक प्रयत्न सुरू आहेत. राज्याच्या कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्जत येथील गतिमान भात पैदास प्रकल्पाप्रमाणे महाराष्ट्रातील इतर कृषी विद्यापीठांतही विविध पिकातील जलद पैदास संरचना प्रकल्प उभारण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे सूतोवाच त्यांनी केले.

### पनवेलमध्ये अवतरणार 'शिव कल्याण राजा'





**पनवेल** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जाज्वल्य इतिहासावर आधारित पं. हृदयनाथ मंगेशकर यांची सांगितिक मैफिल असलेल्या 'शिव कल्याण राजा'चे आयोजन कांतीलाल प्रतिष्ठान रायगड यांनी केले आहे. आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात शनिवारी (दि.२४) सायंकाळी ७:३० वाजता सर्वांसाठी विनामूल्य आणि खुला प्रवेश राहणार आहे. रसिक तसेच छत्रपती प्रेमींनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष कांतीलाल कडू यांनी केले आहे. समर्थ रामदास स्वामी, कविराज भूषण, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर, शंकर वैद्य, वि. वा. शिरवाडकर (कुसुमाग्रज), राम गणेश गडकरी (गोविंदाग्रज) यांच्या सिद्धहस्त लेखणीतून साकारलेल्या छत्रपती शिवरायांच्या स्वातंत्र्य समराचा धगधगता अग्नीकुंड म्हणजे भावगंधर्व, पद्मश्री पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी आवेगी शब्दांना चाल देताना त्यात शिवतेज आणि ओज पुरेपूर ओतलेले आहे. त्यातून आकारास आलेल्या अविट गोडीच्या 'शिव कल्याण राजा' सांगितिक मैफिलीचे आयोजन पुन्हा त्याच जोशात प्रतिष्ठानने खास पनवेलकरांच्या आग्रहाखातर केले आहे. समस्त पनवेल क्षेत्रातील शहरे आणि ग्रामीण भागात रसिक, दर्दी मोठ्या प्रमाणावर आहेत. त्यांची सांस्कृतिक भूक भागविण्याचे महत्कार्य कांतीलाल कडू आणि त्यांचे प्रतिष्ठान सातत्याने गेली अनेक वर्षे यशस्वी आयोजनातून करीत आहेत.




### रस्ता सुरक्षिततेसाठी पथनाट्यातून जनजागृती

**रसायनी** : वाहतूक पोलीस रायगड यांच्यावतीने राष्ट्रीय रस्ते सुरक्षितता सप्ताह साजरा करण्यात आला. यादरम्यान, सानियो स्पेशल स्टील कंपनी खोपोली यांच्यावतीने चौक बाजारपेठेत 'सुरक्षा यमाच्या दरबारी' हे पथनाट्य सादर करण्यात आले. या पथनाट्यातून वाहतूक नियम आणि रस्ता सुरक्षा याबाबत जनजागृती करण्यात आली. पथनाट्याचे लेखन दिग्दर्शन संजय म्हामुणकर यांनी केले असून त्याचे उत्कृष्ट सादरीकरण करण्यात आले. यावेळी नागरिक शालेय विद्यार्थी व बाजारपेठेत आलेले ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अपघात प्रसंगी जखमींना मदत करण्याचे आवाहन पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी करून वाहतुक नियमांची सविस्तर माहिती दिली. रस्ते सुरक्षा खूप महत्वाची आहे, याबद्दल देखील माहिती दिली. यावेळी रायगड जिल्हा वाहतूक पोलीस प्रमुख अभिजीत भुजबळ, पोलीस उप निरीक्षक राजेंद्र आरोळे, सपोनि शिवाजी जुंदरे व चौक प्रभारी विशाल पवार हे उपस्थित होते.

# सुरक्षा रक्षक मंडळाला कायदेशीर नोटीस

■ आगाऊ रकमेची बेकायदेशीर वसुली केल्याचा आरोप

■ थकीत वेतन देण्याची नागरिक मंचाची मागणी

**| नवी मुंबई | प्रतितिनधी |**

महानगर टेलिफोन निगम लिमिटेड आणि इतर आस्थापनांमध्ये नियुक्त असलेल्या सुरक्षा रक्षकांचे वेतन बेकायदेशीररीत्या थकवल्याबद्दल, तसेच त्यांच्या पगारातून अन्यायकारक कपात केल्याबद्दल नवी मुंबईची सजग नागरिक मंच संस्था आक्रमक झाली आहे. याबाबत संस्थेने बृहन्मुंबई व ठाणे सुरक्षा रक्षक मंडळाला कायदेशीर नोटीस बजावली आहे. यावेळी सुरक्षा रक्षकांच्या हक्कांचे उल्लंघन थांबवून १५ दिवसांत थकीत वेतन न दिल्यास कामगार न्यायालयात धाव घेण्याचा इशारा या नोटिशीद्वारे देण्यात आला आहे.



एमटीएनएलमध्ये कार्यरत सुरक्षा रक्षकांचे गतवर्षीच्या ऑगस्ट महिन्याचे वेतन अद्याप प्रलंबित आहे. यापूर्वीही जूनचा पगार ऑक्टोबरमध्ये, तर जुलै व ऑगस्टचे वेतन जानेवारीमध्ये अदा करण्यात आले. वेळेवर वेतन न देणे हे कायद्याचे थेट उल्लंघन असल्याचे सजग नागरी मंचाने म्हटले आहे. तसेच, सजग नागरिक मंचाने पाठपुरावा केल्यानंतर बोर्डाने सुरक्षारक्षकांना प्रलंबित वेतनाच्या बदल्यात आगाऊ रक्कम दिली होती. मात्र, वेतन सातत्याने प्रलंबित राहत असल्याने अनेक रक्षकांनी इतर आस्थापनांमध्ये काम सुरू केले आहे. आता या नवीन ठिकाणच्या पगारातून एमटीएनएलमधील प्रलंबित वेतनाच्या बदल्यात दिलेल्या आगाऊ रकमेची १५ हजार ते २० हजार रुपयांपर्यंत वसुली केली जात आहे. कोणत्याही पूर्वपरवानगीशिवाय केली जाणारी ही कपात पूर्णपणे बेकायदेशीर असल्याचे मंचाचे म्हणणे आहे.

या प्रकरणी सजग नागरिक मंचाने प्रशासनाकडे आग्रही मागण्या केल्या आहेत. यामध्ये एमटीएनएलमधील सुरक्षा रक्षकांचे संपूर्ण प्रलंबित वेतन तात्काळ अदा करावे आणि दरमहा निश्चित तारखेला पगार देण्याची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी केली आहे. वेतन विलंब टाळण्यासाठी सॅलरी प्रोटेक्शन फंड स्थापन करावा, बेकायदेशीररीत्या कापलेली रक्कम व्याजासह परत करावी आणि भविष्यात असा अन्याय टाळण्यासाठी स्पष्ट लेखी धोरण जाहीर करावे, अशा मागण्या मंचाने या नोटिशीद्वारे केल्या आहेत. सजग नागरिक मंचाचे कायदेशीर सल्लागार ॲड. हिमांशू निवृत्ती काटकर यांच्या मार्फत ही नोटीस धाडण्यात आली आहे. नोटीस प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत योग्य कार्यवाही न झाल्यास, कामगार आयुक्त व कामगार न्यायालयात दावा दाखल करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे. या प्रकरणामुळे सुरक्षा रक्षक वर्गात अन्यायाविरुद्ध लढण्याची आशा निर्माण झाली असून, आता प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> “कामाचा मोबदला म्हणून मिळणारे वेतन नियमित मिळणे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क आहे. सुरक्षा रक्षक मंडळ सातत्याने त्याची पायमल्ली करत असून वारंवार निवेदने देऊनही दखल घेतली जात नाही. त्यामुळेच आम्हाला कायदेशीर मार्गाचा अवलंब करावा लागला आहे.”
>
> – ॲड. हिमांशू काटकर, सदस्य, सजग नागरिक मंच, नवी मुंबई

### रक्तदान शिबिरास उत्स्फुर्त प्रतिसाद

**| हमरापूर | प्रतिनिधी |**

जगद्गुरु श्रीमत रामानंदचार्य नरेंद्रचार्यजी यांच्या प्रेरणेने पेण येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. जगद्गुरु श्रीमत रामानंदचार्य नरेंद्रचार्यजी दक्षिण पीठ नानिजधाम यांच्या प्रेरणेने जीवनदान महाकुंभ दि.४ ते १८ जानेवारीपर्यंत असे १५ दिवस रुग्णांना विनामूल्य रक्त उपलब्ध करून देण्याचा उपक्रम यावर्षीही संस्थांतर्फे राबविला गेला आहे. नुकतेच एम.जि.एम. रुग्णालय कामोठे यांच्या संयुक्त विद्यमाने पेण शहरातील नगरपालिकेच्या इमारतीत हे रक्तदान शिबीर घेण्यात आले. यावेळी शहरासह तालुक्यातील अनेक तरुण-तरुणींनी रक्तदान केले. मानवी जीवनात दानाचे महत्त्व अनमोल आहे. आपल्या दानाने कुणाची आयुष्य वाचते ते रक्तदान सर्वश्रेष्ठ पुण्य ठरते, असे आकाश पाटील यांनी बोलताना सांगितले. या शिबिरास संस्थानचे ब्लड इन नीड पीठ प्रमुख आकाश पाटील, तालुकाध्यक्ष किरण म्हात्रे, तालुका प्रसिद्धी प्रमुख देविदास पाटील व पेण तालुका सेवा समिती उपस्थित होते.

## पनवेलमध्ये जनजागृती स्कूल बस रॅली



**| पनवेल | प्रतिनिधी |**

राष्ट्रीय सुरक्षा अभियानानिमित्त पनवेल शहर वाहतूक शाखा, कळंबोली परिवहन विभाग, कळंबोली वाहतूक शाखा व काळज समाज मध्यवर्ती यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच पनवेल रिक्षा विद्यार्थी वाहक संस्थेच्या सहकार्याने जनतेमध्ये वाहतूक नियमांविषयी जनजागृती करण्यासाठी भव्य स्कूल व्हॅन व बस रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.

ही रॅली खांदेश्वर शिवमंदिर, आदई तलाव, नवीन पनवेल सिग्नल, वीर सावरकर चौक ते पनवेलमधील काळज समाज हॉल या मार्गावरून काढण्यात आली. या रॅलीमध्ये पनवेल शहर वाहतूक शाखेची पीटर मोबाईल, पनवेल बीट मार्शल वाहन, कळंबोली वाहतूक शाखेची पीटर मोबाईल तसेच प्रादेशिक परिवहन कार्यालय कळंबोली यांची सरकारी वाहने, अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते. यासोबतच पनवेल विद्यार्थी वाहक संस्थेच्या सुमारे ३५ ते ४० स्कूल बसेस रॅलीत सहभागी झाल्या होत्या. या रॅलीची सांगता काळज समाज हॉल येथे करण्यात आली. त्यानंतर याच ठिकाणी वाहतूक नियम मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार अमीर मुलाणी, युवराज येळे, महेंद्रसिंग राजपूत, महेंद्र गळवी, सचिन बुधवंत आदी अंमलदार तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी, पालक, पनवेल विद्यार्थी वाहक संघटनेचे चालक, सदस्य व पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे आमदार विक्रांत पाटील यांनी उपस्थितांना वाहतूक सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करत वाहतूक नियम पाळण्याचे आवाहन केले. त्यानंतर वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक जीवन शेरखाने यांनी विद्यार्थ्यांशी व पालकांशी थेट संवाद साधत वाहतूक नियम पाळण्याचे महत्त्व स्पष्ट केले. वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे होणाऱ्या अपघातांचे सांख्यिकी विश्लेषण सादर करून जनजागृती करण्यात आली.

## राष्ट्र सेविकांचे प्रेरणादायी पथसंचलन




■ कोकणात एकाच दिवशी १९ ठिकाणी संचलन

■ एकूण २३९ सेविकांचा सहभाग

**| माणगाव | प्रतिनिधी |**

राष्ट्र सेविका समितीच्या वर्धापनदिनानिमित्त रविवारी (दि.१८) कोकण प्रांतामध्ये एकाच दिवशी व एकाच वेळी एकूण १९ ठिकाणी भव्य सघोष पथसंचलनांचे आयोजन करण्यात आले होते. या उपक्रमांतर्गत माणगाव येथे भव्य पथसंचलन उत्साहात पार पडले. या पथसंचलनात एकूण २३९ सेविका सहभागी झाल्या होत्या. त्यामध्ये १५८ सेविका पूर्ण गणवेशात, १३८ सेविका संचलनात चालत, २० घोष सेविका, तसेच मंगलवेश पथकातील सेविकांचा सहभाग होता. कार्यक्रमाच्या व्यवस्थेसाठी ६० बंधुगण उपस्थित होते. या शिस्तबद्ध, प्रेरणादायी पथसंचलनास माणगावकर नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

हे पथसंचलन साबळे हायस्कूल माणगाव येथून सुरू होऊन संपूर्ण माणगाव शहरातील मुख्य बाजारपेठेतून शिस्तबद्ध मार्गक्रमण करत पार पडले. रायगड जिल्ह्यातील आठही तालुक्यांतील राष्ट्र सेविका समितीच्या सेविकांनी अत्यंत एकसंध, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी सहभाग नोंदवला. पथसंचलनादरम्यान सेविकांकडून वैयक्तिक व सांघिक गीतांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. घोष व गीतांच्या तालावर परिसरात राष्ट्रभक्ती, शिस्त आणि सेवाभावाची ऊर्जा निर्माण झाली. या कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या म्हणून कोकण प्रांत व्यवस्था प्रमुख स्मिता आंबेकर उपस्थित होत्या. तसेच, रायगड जिल्हा कार्यवाह रुचिता काळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

## बाल संस्कार शिबीर उत्साहात

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

पेण तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभा जिल्हा रायगड उत्तर अंतर्गत शाखा व श्रमण बुद्ध विहार कमिटी तसेच क्रांतीनगर ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने बालसंस्कार शिबिराचे आयोजन रविवारी (दि.१८) करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष सुशील वाघमारे यांच्या हस्ते करण्यात आले. पेण येथील श्रमण बुद्ध विहार क्रांतीनगर येथे झालेल्या या शिबीराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.



पेण तालुकाध्यक्ष चंद्रकांत सोनावणे यांच्या अध्यक्षतेखाली ५ दिवसीय बाल संस्कार शिबीर आयोजित करण्यात आले आहे. यावेळी जिल्हा सरचिटणीस प्रकाश सोनावणे, जिल्हा संस्कार उपाध्यक्ष तथा मुख्य मार्गदर्शक संतोष जाधव, जिल्हा संघटक सिद्धार्थ गायकवाड आदी मान्यवरांसह जिल्ह्यातील पदाधिकारी, तालुका पदाधिकारी व शिबिरार्थी उपस्थित होते. या शिबिराला बालकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला. या शिबिराचे मुख्य मार्गदर्शक संतोष जाधव यांनी शिबिरार्थींना सखोल मार्गदर्शन करीत बावीस प्रतिज्ञा आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बालपणाची माहिती दिली. याप्रसंगी सुशील वाघमारे यांनी आपल्या मार्गदर्शनात बाळ शिबिराचे महत्व व संस्थेच्या २४ शिबिरांची माहिती समजावून सांगितली. जिल्हा सरचिटणीस प्रकाश सोनावणे यांनी शुभेच्छापर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष चंद्रकांत सोनावणे यांनी आपले विचार मांडताना, येणाऱ्या काळात पेण तालुक्यात संस्थेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात शिबीरे राबविण्याचे मानस असल्याचे सांगितले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सरचिटणीस सचिन कांबळे यांनी केले. या शिबिराच्या माध्यमातून बौद्ध धम्माबरोबरच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचारांबाबत मोलाचे मार्गदर्शन मान्यवरांनी करीत बालकांमध्ये चांगले संस्कार निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

### सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

नगरसेवकांच्या विजयी रॅलीदरम्यान तिघांच्या गळ्यातील सोन्याची चेन आणि मंगळसूत्र चोरीला गेल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. जय चंद्रन के वासू हा व्ही.के. हायस्कूल येथे मतमोजणीच्या ठिकाणी आले होते. उमेदवार निवडून आल्याने प्रभागातील लोकांनी वडाळे तलाव या ठिकाणी रॅली काढली. रॅली चालू असताना त्यांच्या गळ्यातील तीन तोळ्याची सोन्याची चेन गळ्यात नसल्याचे लक्षात आले. याचदरम्यान रॅलीमध्ये त्यांच्यासोबत असणाऱ्या शैला चनवीर यांच्या गळ्यातील एक तोळे वजनाची सोन्याचे मणी मंगळसूत्र चोरीला गेले. तसेच, निलेश पगारे यांच्या गळ्यातील एक तोळ्याची सोन्याची चैन चोरीला गेली.

## बनावट मद्यप्रकरणी कारवाई

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभागे बनावट मद्य विक्री करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले आहे. त्यांच्याकडून एकूण ७८ हजार रुपयांचा मद्य जप्त करण्यात आला आहे.

राज्य उत्पादन शुल्क पनवेल शहर विभागाच्या निरीक्षकांना शुक्रवारी (दि.१६) रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन व्यक्ती बनावट विदेशी मद्यची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार त्या ठिकाणी सापळा रचण्यात आला. यावेळी खांदेश्वर रेल्वे स्टेशन परिसरात दोन संशयित व्यक्ती प्रवासी बॅगा खांद्यावर घेऊन जात असताना त्यांची तपासणी केली. यावेळी त्यांच्या बॅगमध्ये बनावट विदेशी मद्य सापडून आले. ते मद्य वसईवरून आणले असल्याचे त्यांनी सांगितले.



■ एकूण ७८ हजार १८८ रुपयांचा मुद्देमाल जप्त

त्यानुसार वसई येथील आरोपीच्या घरी छापा टाकला असता बनावट मद्याने बॉटलिंग केलेल्या बाटल्या, गोवा राज्य व दादरा नगर हवेली निर्मित आणि विक्रीसाठी आणलेल्या विदेशी मद्याच्या रिकाम्या प्लास्टिक व काचेच्या बाटल्या आणि इतर बाटल्या जप्त करण्यात आल्या. असा एकूण ७८ हजार १८८ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### अंतिम ११ स्पर्धकांमधून निवड | विजेत्यांचा पारितोषिके देऊन सन्मान

# गायन स्पर्धेत स्नेहल पाटील विजयी

**| पनवेल | प्रतिनिधी |**

'पनवेल कल्चरल सेंटर'तर्फे आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय शास्त्रीय ख्याल गायन स्पर्धेची अंतिम फेरी नुकतीच संस्थेच्या सभागृहात पार पडली. या स्पर्धेत राज्यभरातून एकूण २४ स्पर्धकांनी भाग घेतला होता. पहिल्या फेरीसाठी स्पर्धकांकडून त्यांच्या पसंतीच्या रागातील वीस मिनिटांच्या गायनाचे व्हिडिओज मागविण्यात आले होते. नंदकुमार कर्वे, मिलिंद गोखले आणि मधुरा सोहनी यांनी या गायनाचे परीक्षण करुन त्यातून ११ स्पर्धकांची निवड अंतिम फेरीसाठी केली. त्यात स्नेहल पाटील यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.




यावेळी अंतिम फेरीच्या स्पर्धेचे परीक्षण डॉ. राम नेने आणि डॉ. अनया थत्ते यांनी केले. स्पर्धेनंतर स्पर्धकांना मार्गदर्शन करताना डॉ. राम नेने म्हणाले की, अंतिम फेरीतील सर्वच स्पर्धक तयारीचे होते. आता व्यावसायिक गायक होण्याकडे तुमची वाटचाल सुरू व्हायला हवी. गाणं सादर करताना तुम्ही इतरांपेक्षा काय वेगळे गाता, हे महत्त्वाचे आहे आणि तेच श्रोत्यांना आकर्षित करते. तर, डॉ. अनया थत्ते म्हणाल्या की, गाण्याचे दोन प्रकार आहेत. एक स्वान्तसुखाय आणि दुसरे श्रोत्यांसाठी. श्रोत्यांसाठी गाताना गाण्यातून श्रोत्यांशी संवाद साधायला हवा. फक्त तालासुरात गाता येणे पुरेसे नाही, लयही अतिशय महत्त्वाची आहे. प्रत्येक रागाचे स्वतःचे एक सौंदर्य असते. ते गाण्यातून प्रगट व्हायला हवे. तुम्हाला समजलेला राग तुम्ही श्रोत्यांसमोर कसा मांडता, ते महत्वाचे आहे. गाण्याचा आनंद स्वतःही घेतला पाहिजे आणि श्रोत्यांनाही देता आला पाहिजे. श्रोत्यांसाठी जेव्हा आपण गायन करतो तेव्हा श्रोत्यांच्या अपेक्षाही पूर्ण करण्याच्या जबाबदारीने गायन करायला हवे आणि स्पर्धेसाठी जर गायन करत असाल तर इतरांपेक्षा आपलं काहीतरी वेगळे गायनात असले पाहिजे.

त्यानंतर स्पर्धेतील विजेत्यांना परीक्षकांच्या हस्ते रोख रक्कम, स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि सुरेश राव यांनी संपादित केलेल्या सलिल चौधरी यांच्यावरील पुस्तकाचा समावेश असलेली पारितोषिके देण्यात आली. यावेळी १० हजार रुपयांचे शैलजा तळेकर स्मृती प्रथम पारितोषिक स्नेहल पाटील हिने पटकावले. तर, ७ हजार रुपयांचे शुभदा मधुकर दशपुत्रे स्मृती द्वितीय पारितोषिक सिद्धार्थ गोडांबे यांस मिळाले. तसेच, ५ हजार रुपयांचे प्रभाकर आघारकर स्मृती तृतीय पारितोषिक निरंजन पेडगावकर याला, तर ४ हजार रुपयांचे विश्वास भिडे स्मृती उत्तेजनार्थ पारितोषिक मृण्मयी भिडे हिला देण्यात आले. याशिवाय या स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी निवड झालेला सर्वात लहान स्पर्धक म्हणून अंशुल बोपर्डीकर याला ३ हजार रुपयांचे गोपाळकृष्ण राव स्मृती पारितोषिक देण्यात आले. मधुरा सोहनी यांनी स्पर्धा समिती प्रमुख म्हणून उत्तम नियोजन केले आणि त्यांना श्रीधर सप्रे, नंदकुमार कर्वे, चंद्रकांत मने, अजय भाटवडेकर, शशिकांत पाटील प्रभृतींची उत्तम साथ लाभली.

# हवी आहे, कडवी निष्ठा

महापालिकांच्या निवडणुकांमध्ये सर्वांचे लक्ष मुंबई व त्या खालोखाल पुण्याकडे होते. ठाकरे सेनेकडे मुंबई राहणार की नाही याला कमालीचे महत्व देण्यात आले. वास्तविक विधानसभेचे आकडे पाहता आणि घटलेला मराठी टक्का लक्षात घेता ठाकरे सेनेची लढाई कठीण होती. त्यातच ठाकरे यांनी स्वतःला मराठी माणसांपुरते मर्यादित करून आणखी पंचाईत करून घेतली. उद्धव यांनी पाच वर्षांपूर्वी मी मुंबईकर अशी मोहिम राबवली होती. तीच पुढे चालवून आपल्याला मुंबईला वाचवायचे आहे अशी भूमिका घेतली असती तर भाजपच्या तथाकथित विकासाच्या विरोधात असलेले इतर घटकही कदाचित ठाकरे यांच्यासोबत आले असते. मुंबई, महाराष्ट्रातले सर्व प्रकल्प अदानीला देऊन टाकण्याच्या भाजपच्या धोरणांवर राज ठाकरे यांनी उत्तम प्रेझेंटेशन केले होते. हा अदानी केवळ मराठी लोकांना नको आहे असे नव्हे. तो गुजराती, जैन, मारवाडी व्यापारी, कंत्राटदार, बिल्डर यांनाही त्रासदायक ठरतो आहे. अगदी टाटा, बिर्ला, अंबानी, गोदरेज, महिंद्रा यांनाही अदानी एके अदानी हे सरकारचे धोरण खटकत असतेच. त्याचा फटकाही त्यांना बसत असतो. अदानीच्या विकासाला धारावीतील सर्व धर्म, जाती व भाषकांचा विरोध आहे. म्हणूनच तर ठाकरे सेनेला तेथे चांगले यश मिळाले आहे. हाच धागा उचलून ठाकरे यांनी आता आपले राजकारण मराठींसह सर्व समाजांना आकर्षित करेल अशा रीतीने मांडायला हवे. तसे केले तर त्यांना टाटा, अंबानीपासून ते रस्त्यावरच्या हिंदी वा मुस्लिमांचाही पाठिंबा मिळू शकेल. दुसरा प्रमुख विरोधी पक्ष काँग्रेसलाही उलट्या बाजूने हाच धडा घेण्याची गरज आहे. काँग्रेसने अनेक ठिकाणी ठाकरे सेनेसोबत युती केली. पण मुंबईत ठाकरे सेनेसोबत राज ठाकरे असल्याने त्यांच्यासोबत युती केली तर हिंदी भाषक राज्यांमध्ये आपल्याला फटका बसेल असा तर्क काँग्रेसच्या नेत्यांनी पुढे केला आणि त्यांनी एकट्याने निवडणुका लढवल्या. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. भाजपला फायदा झाला. म्हणजे ज्या भाजपाला विरोध करण्यासाठी सगळेजण झटत आहेत तोच मजबूत झाला.

## काँग्रेसचे यश आणि चिंता

राज्यात इतरत्रही भाजपचाच वरचष्मा आणि बाकीच्यांची दाणादाण आहे. यामध्ये काँग्रेसची स्थिती विलक्षण आहे. महाराष्ट्र एकेकाळी ज्याचा बालेकिल्ला होता अशा या पक्षाला इचलकरंजीसारख्या सहकार सम्राटांच्या गावात शून्य जागा आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये धुळ्याची निवडणूक काँग्रेसने गाजवली होती. तेव्हा मालेगावच्या मुस्लिम मतांवर काँग्रेस विजयी झाल्याची टीका भाजपने केली होती. ती खरी असावी असे दिसते. कारण धुळ्यात काँग्रेसला भोपळाही फोडता आलेला नाही. पण जळगाव, पिंपरी, चिंचवड, ठाणे इथेही हीच स्थिती आहे. तरीही एक महत्वाची गोष्ट अशी आहे की, काँग्रेस इतकी दुबळी होऊनही अजूनही तिचा मतदार सर्वदूर पसरलेला आहे. हा मतदार आणि स्थानिक कार्यकर्ते काँग्रेसचा झेंडा वर धरून आहेत. भाजपच्या बुलडोझर राजकारणात ही कौतुकास्पद गोष्ट म्हणायला हवी. शरद पवार यांचा राष्ट्रवादी बहुसंख्य जिल्ह्यांमधून नामशेष झालेला असताना काँग्रेसला बहुतांश जिल्ह्यांमध्ये किमान एक तरी जागा मिळाली आहे. मीरा भाईंदरमध्ये भाजप आणि शिंदे सेनेच्या लढाईत या पक्षाला तब्बल १३ जागा मिळाल्या आहेत. जालन्यात कैलाश गोरंट्याल पक्ष सोडून जाऊनही ९, नांदेडमध्ये अशोक चव्हाणांनी पक्ष भाजपमध्ये पळवून नेऊनही १०, नागपूरमध्ये फडणवीस अधिक गडकरी यांची ताकद असूनही ३४, पुण्यात अजितदादांचा दारुण पराभव होत असतानाही १५, परभणीमध्ये भाजपच्या बरोबरीने १२ आणि मुंबईत इतकी पडझड होऊनही २४ जागा काँग्रेसला मिळू शकल्या आहेत. पण दुर्दैवाने काँग्रेसचे नेतृत्व आणि खालचे कार्यकर्ते यांच्यात कसलाच ताळमेळ नाही. त्यामुळे भिवंडी आणि चंद्रपूरमध्ये सर्वाधिक जागा मिळालेल्या असूनही काँग्रेसचा महापौर होईल असे खात्रीने सांगता येत नाही अशी अवस्था आहे. चंद्रपूरमध्ये भाजपवाले ठाकरे गटाला हाताशी धरून महापौर करण्याच्या प्रयत्नात आहेत. अन्य ठिकाणी काँग्रेसचे गट फुटतात की काय याची चिंता आहे. अलिकडेच अंबरनाथ नगरपालिकेत काँग्रेसचे १२ नगरसेवक निवडून आले होते. पण त्यांनी फुटून भाजपशी हातमिळवणी केली. हीच स्थिती ठाकरे सेनेचीही आहे. त्यांचेही काही ठिकाणी चांगले नगरसेवक निवडून आले आहेत. पण ते भक्कम वा निष्ठावान राहतील अशी हमी कोणीही देऊ शकत नाही.

## भाजप व इतरांमधील फरक

संख्या कितीही असली तरी कधीही फुटतील किंवा फोडले जाऊ शकतील अशी काँग्रेसची आणि ठाकरे सेनेची अवस्था आहे. याला कारण पक्ष म्हणून यांची बांधणीच ठीक झालेली नाही. इंदिरा, राजीव, सोनिया गांधी किंवा बाळासाहेब ठाकरे यांची पुण्याई आहे. काँग्रेस व शिवसेना हे नाव लोकांमध्ये रुजलेले आहे. त्याचा आधार घेऊन लोक निवडून येतात. पण पक्षाशी बांधील राहायलाच हवे असे त्यांना वाटत नाही. अशोक चव्हाणांसारखा माजी मुख्यमंत्री काँग्रेसवर कोणत्याही थराला जाऊन टीका करतो आणि मोदींच्या चरणी लोटांगण घालतो याहून दुसरे दुर्दैव काय असणार. एकेकाळी ठाकरे सेनेचे लोक कडवट मानले जात असत. पण भुजबळ, राणे, राज ठाकरे यांच्यापासून तमाम लोकांनी गद्दारी केली. शिंदे यांनी तर त्यावर कळस चढवला. परवा निवडून आल्यावर त्यांनी बाळासाहेबांच्या आशीर्वादाने व नरेंद्र मोदींच्या मार्गदर्शनामुळे आपला पक्ष निवडून आला अशा जाहिराती त्यांनी दिल्या. या जाहिरातींमध्ये मोदी व शाह यांच्या जोडीने भाजपचे अध्यक्ष जेपी नड्डा यांचाही फोटो होता. राज्याचे उपमुख्यमंत्री असलेल्या शिंदे यांना इतकी लाचारी करण्याची खरे तर गरज नाही. पण कच्चे विचार आणि कंत्राटदारी मनोवृत्ती यामुळे त्यांना मनापासून कसलीच बांधिलकी वाटत नाही. त्यामुळेच मग खालचे नगरसेवक किंवा कार्यकर्ते हेही विकत घेण्याच्या बाजारात उभे राहतात. याउलट भाजपकडे पाहा. भाजपचे नगरसेवक अगदी अल्प संख्येने असले तरी तिथे ते फुटण्याची शक्यता कमी असते. किंबहुना, एकनाथ खडसे किंवा धनंजय मुंडे असे मोजके अपवाद वगळता भाजपमधून मोठे नेते कधीही बाहेर पडलेले नाहीत. आणि समजा पडले तरी त्यांच्यामुळे पक्षातच फूट पडली किंवा पक्ष दुर्बळ झाला असे घडलेले नाही. धनंजय मुंडे यांच्यामुळे बीडमध्ये तात्कालिक फटका बसला. पण भाजप तिथे सावरला. खडसे तर आज नगण्य होऊन गेले आहेत. भाजपने आपल्या विचारसरणीच्या जोरावर हे स्वत्व टिकवले आहे. ही विचारसरणी विघातक आहे पण ती लढाऊ व बांधिलकी शिकवणारी आहे. भाजपला हरवायचे असेल तर इतर पक्षांना अशीचखालपासून वर बांधलेली संघटना, कार्यकर्त्यांमध्ये निर्माण केलेला कडवेपणा निर्माण करावा लागेल. आज मुंबईमध्ये ठाकरे गटाचा पाठिंबा घेऊन भाजपचा महापौर बसवण्याच्या बातम्या आल्या आहेत. ठाकरे गटाने त्याचा इन्कार केला आहे. पण आपल्याविषयीच्या तद्दन खोट्या बातम्यादेखील विश्वासार्ह वाटू शकणे हाच ठाकरे गटाने आपला पराभव मानायला हवा. केरळात मार्क्सवादी कम्युनिस्ट भाजपसोबत सरकार स्थापन करणार अशी बातमी कधीही येऊ शकत नाही हे इथे लक्षात ठेवायला हवे.

विचार

# नववर्षी जगाच्या नकाशावर भारत कुठे?

***अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कारकिर्दीला एक वर्ष पूर्ण होत आहे. या कालावधीत त्यांनी जगाच्या अर्थकारणाला झळ पोहोचवत आयात शुल्कात वाढ, माल आयात करण्यावर संख्यात्मक नियंत्रणे, व्हिसा देण्यावर निर्बंध अशी अनेक धोरणे त्यांनी जाहीर केली. त्यामुळे जागतिक व्यापाराला फटका बसला. अमेरिकेची अर्थव्यवस्था ३.२ टक्के गतीने वाढेल, अशी अपेक्षा होती. प्रत्यक्षात ती ४.३ टक्क्यांनी वाढत आहे.***



हेमंत देसाई

अमेरिकेतील उपभोगखर्चात वाढ झाली असून, निर्यातही लक्षणीयरीत्या वाढली आहे. ट्रम्प प्रशासनाने संरक्षणक्षेत्रावरील खर्च वाढवला असून, त्यामुळे त्या क्षेत्राचा विकासदर आणि रोजगारनिर्मिती वाढली आहे. मुख्य म्हणजे बहुतेक देशांमधील आयात महाग झाल्यामुळे अमेरिकेचा आयातीवरील खर्च कमी झालेला आहे. अमेरिकेतील देशांतर्गत मागणी कमी झाली असली, तरी ही उणीव वाढती निर्यात आणि संरक्षणक्षेत्राचा विस्तार यातून भरून निघाली आहे. त्यामुळे सप्टेंबर २०२५ मध्ये संपलेल्या तिमाहीमध्ये अमेरिकेतील व्यक्तिगत उपभोगखर्चाचा किंमत निर्देशांक २.८ टक्क्यांनी वाढला. त्या अगोदरच्या तिमाहीमध्ये तो २.१ टक्क्यांनीच वधारला होता. अमेरिकेच्या अर्थव्यवस्थेची भरभराट होणे भारताच्या अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने हिताचे आहे, कारण त्यामुळे भारतातील तंत्रज्ञान व सेवा उद्योगाची मागणी वाढते. शिवाय अमेरिकेतून भारतात येणाऱ्या रेमिटन्सेसमध्ये, म्हणजे पैशाच्या ओघातही वाढ होते. अमेरिकेने भारतावरील आयात शुल्कात वाढ केली असली, तरी सरलेल्या नोव्हेंबरमध्ये भारतातून जहाजाने जाणाऱ्या मालाच्या निर्यातीत वाढ झाली. जेम्स अँड ज्वेलरी जडजवाहीर आणि सुवर्णालंकार यांच्या निर्यातीमध्ये लक्षणीय वाढ झाली तसेच औषधे आणि इलेक्ट्रॉनिक्स शुल्कवाढ अद्याप लागू झालेली नाही. त्यामुळे या क्षेत्रांना अमेरिकी निर्बंधांचा तसा फटका बसला नाही. भारत आणि अमेरिकेतील व्यापार करारावर चर्चा सुरू होऊन बरेच महिने लोटले आहेत.

मध्यंतरी, अमेरिकेने व्यापार कराराची चर्चाच खंडित केली होती. भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्यामुळे २५ टक्के दंडही आकारण्यात आला होता. ट्रम्प यांनी भारतावर ५० टक्के आयात शुल्क लादले आहे. उभय देशांमध्ये वाटाघाटी सुरू आहेत, चर्चा प्रगतिपथावर आहे, ती अंतिम टप्प्यावर आहे, असे सातत्याने सांगितले जात आहे. केंद्रीय व्यापारमंत्री पीयूष गोयल संभाव्य कराराबद्दल आपण आशावादी आहोत, असे सातत्याने म्हणत आले आहेत. भारताने आपल्या शेतमालाची बाजारपेठ खुली करावी, यासाठी अमेरिका दबाव आणत असून, या दबावाला आपण बळी पडणार नसल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले होते. अमेरिका व्यापारासाठी नवनव्या शर्ती लादत असली, तरी भारताने आता अंतिम प्रस्ताव दिला आहे. भारतातून अमेरिकेत धाडल्या जाणाऱ्या मालावर जास्तीत जास्त पंधरा टक्के आयात शुल्क लागू करावे. तसेच भारत रशियाकडून तेल आयात करत असल्यामुळे अमेरिकेने लादलेले २५ टक्के शुल्क रद्द करावे, अशी भारताची मागणी आहे. भारताच्या मागण्या अमेरिका मान्य करेल आणि येत्या जानेवारीतच दोन्ही देशांमध्ये करार होईल, अशी अपेक्षा भारताचे वाणिज्य सचिव राजेश अग्रवाल यांनी व्यक्त केली आहे. या मागण्या मान्य झाल्यास, भारतीय कंपन्यांना अमेरिकेकडून नवीन ऑर्डर्स मिळतील. त्यामुळे भारतात अधिक डॉलर्स येतील, देशांतर्गत रोजगारनिर्मिती वाढेल, त्याचप्रमाणे घसरलेला रुपयादेखील मजबूत होऊ शकेल. अर्थात अमेरिका भारताच्या सर्व मागण्या मान्य करेल, याची काहीही खात्री नाही. शिवाय त्या बदल्यात भारताला आपली बाजारपेठ काही प्रमाणात खुली करून द्यावी लागण्याची शक्यता आहे.

सुदैवाने भारताची रशियासोबत मुक्त व्यापार करारासाठीची चर्चा प्रगतिपथावर आहे. त्याचबरोबर रशिया, आर्मेनिया, बेलारूस, कझाकिस्तान आणि किर्गिस्तान हे देश मिळून झालेल्या युरेशियन इकॉनॉमिक युनियनशीही भारत मुक्त व्यापार करार करणार आहे. हा करार प्रत्यक्षात उतरेल, तेव्हा भारताच्या आयात-निर्यात व्यापारात उल्लेखनीय वाढ होऊ शकते. केवळ रशियाबरोबरच भारताचा व्यापार ६८ अब्ज डॉलरइतका असून, २०३० पर्यंत हा आकडा शंभर डॉलर्सपर्यंत नेण्याचे उद्दिष्ट दोन्ही देशांनी ठरवले आहे. युक्रेन युद्ध संपवण्यात अमेरिकेला यश आलेले नाही. २०२६ मध्ये हे युद्ध समाप्त करण्यास अमेरिकेला यश आल्यास युक्रेनमधील अमेरिकेची गुंतवणूक वाढेल. हा करार युक्रेनपेक्षा अमेरिका आणि रशियाच्या दृष्टीने फायद्याचा असेल, अशी शक्यता आहे. मात्र ते काहीही असले, तरी युक्रेन त्याचप्रमाणे गाझापट्टीत शांतता निर्माण होणे हे जागतिक व्यापार तसेच भारताच्याही दृष्टीने लाभदायक ठरणार आहे. लोक सामान्यतः भूतकाळाचा, गेलेल्या वर्षाचा आढावा घेतात. त्यातून धडे घेतले गेले जातात; परंतु पुढे जाण्याचा मार्ग, आव्हाने आणि क्षमता यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. नवीन वर्षासाठी 'भूतकाळ विसरून जा, पुढे पहा' या तत्त्वाचा विचार केला पाहिजे. भारत आज एका महत्त्वाच्या टप्प्यावर उभा आहे. २०२६ पर्यंत भारत आपल्या जलद आर्थिक वाढीला सामाजिक संतुलन, राजकीय स्थिरता आणि अंतर्गत सुरक्षिततेशी जोडू शकला आहे, की नाही हे स्पष्ट होईल.

विकास, लोकशाही आणि सुरक्षा एकमेकांना पूरक असतील, तर भारत केवळ आपल्या नागरिकांसाठी चांगले भविष्य निर्माण करू शकणार नाही, तर एकविसाव्या शतकातील जागतिक व्यवस्थेत एक निर्णायक शक्ती म्हणून उदयास येईल. आज भारत केवळ एक विकसनशील देश नाही, तर जागतिक धोरणनिर्मितीत सक्रिय सहभागी आहे. 'जी २०', 'क्वाड' आणि 'ब्रिक्स' संघटनांमध्ये जागतिक दक्षिणेचा आवाज म्हणून भारताची भूमिका वाढली आहे. एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात भारत अशा टप्प्यातून जात आहे, जिथे विकास, राजकारण आणि राष्ट्रीय सुरक्षा एकमेकांशी खोलवर जोडलेले आहेत. आज, भारत केवळ जगातील सर्वात जास्त लोकसंख्या असलेला देश नाही, तर एक उदयोन्मुख जागतिक शक्ती, वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आणि राजकीयदृष्ट्या सक्रिय लोकशाहीदेखील आहे. २०२६ हे वर्ष भारतासाठीही महत्त्वाचे आहे. कारण या काळात सरकारच्या अनेक दीर्घकालीन धोरणांची, अंतर्गत सुरक्षा ध्येयांची आणि राजकीय धोरणांची परीक्षा घेतली जाईल. गेल्या दशकात भारताच्या अर्थव्यवस्थेचा लक्षणीय विस्तार झाला आहे. आज, भारत जगातील पहिल्या पाच अर्थव्यवस्थांमध्ये आहे आणि पुढील काही वर्षांमध्ये तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनवण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. पायाभूत सुविधा, डिजिटल अर्थव्यवस्था, स्टार्ट-अप संस्कृती आणि देशांतर्गत उत्पादन (मेक इन इंडिया) हे या वाढीचे प्रमुख आधारस्तंभ आहेत.

आज रस्ते, एक्सप्रेस वे, रेल्वे आधुनिकीकरण, नवी बंदरे आणि विमानतळ उभारणी यांनी भारताची अंतर्गत कनेक्टिव्हिटी आणि गुंतवणूक आकर्षण मजबूत केले आहे. डिजिटल पेमेंट सिस्टीम, आधार-जन धन-मोबाइल त्रिमूर्ती आणि सरकारी सेवांचे डिजिटलायझेशन हे भारताच्या विकासाच्या कथेला वेगळे करतात. सुरक्षा दलांच्या कडक कारवाईसह, रस्ते, शाळा, आरोग्य केंद्रे आणि रोजगार योजनांच्या बांधकामामुळे पूर्वी जवळपास अनुपस्थित राहिलेल्या क्षेत्रात आता सरकारची उपस्थिती मजबूत झाली आहे. हा बदल केवळ लष्करी नाही, तर प्रशासकीय आणि सामाजिकही आहे. २०२६ पर्यंत दहशतवादी कारवाया कमी करण्याची सरकारची योजना आहे. त्यामुळे पर्यटन, अर्थव्यवस्था आणि स्थानिक जीवन सामान्य होईल. भारताची प्रगतीगाथा केवळ यशाची माहिती नाही. हा संधी आणि आव्हानांचा संगम आहे. आर्थिक विकासाला सर्वसमावेशक बनवणे, सुरक्षेचे चिरस्थायी शांततेत रूपांतर करणे, राजकारणाला संघर्षातून निराकरणाकडे वळवणे आणि मजबूत आणि संतुलित लोकशाही राखणे हे भारताच्या यशाचे मापदंड असतील. भारत नक्षलवाद आणि काश्मीर दहशतवादासारख्या खोल अंतर्गत सुरक्षा धोक्यांवर मात करेल तेव्हा त्याचा परिणाम आंतरराष्ट्रीय स्तरावर खोलवर होईल. यामुळे भारत एक सुरक्षित, स्थिर आणि गुंतवणूक-अनुकूल राष्ट्र म्हणून स्थापित होईल. रोजगार आणि विकास, निर्वासित/नागरिकत्व कायदे, स्थानिक ओळख आणि सामाजिक समिकरणांशी संबंधित जुने वादविवाद हे आता सुधारणेसाठी प्रमुख मुद्दे असतील.

# कृषीवल हळदीकुंकू घराघरात

प्रमोद जाधव

बातमीच्या रुपात सर्वसामान्यांचा आवाज म्हणून ओळखला जाणारे दैनिक कृषीवल कायमच पिडीत, शोषित, शेतकरी, कष्टकरी, अन्यायग्रस्तांच्या बाजूने उभे राहिले आहे. त्यामुळे कृषीवलची एक वेगळी ओळख आजही कायम आहे. बातमीचे काम करीत असताना सामाजिक बांधिलकी जपत कृषीवलमार्फत नवनवीन उपक्रम राबवित आहे. त्याचाच एक भाग म्हणून महिलांच्या सन्मानासाठी, विचारांची देवाण घेवाण करता यावी, यासाठी कृषीवलने हळदी कुंकू समारंभ नुकताच आयोजित केला. ही ३१ वर्षाची परंपरा अखंडितपणे जपण्याचे काम केले. या कार्यक्रमाला हजारोच्या संख्येने महिलांनी उपस्थिती दाखवून सौभाग्याचे वाण लुटले, वेगवेगळ्या मनोरंजानासह स्पर्धांमध्ये सहभाग घेऊन व्यक्त झाल्या. त्यामुळे कृषीवल हळदी कुंकू समारंभाची चर्चा घराघरात पोहचत असताना संपुर्ण महाराष्ट्रातही त्याची चर्चा होत आहे.

दरवर्षी कृषीवल हळदी कुंकू १६ जानेवारीला साजरा केला जातो. जानेवारी महिना उजाडल्यावर महिलांची कृषीवल हळदीकुंकू समारंभाबाबत उत्कंठा शिगेला पोहचली होती. अखेर ही उत्कंठा शुक्रवारी सायंकाळी चारनंतर संपली. दुपारी तीन वाजल्यापासून महिला येण्यास सुरुवात झाली. बोलता बोलता महिलांची अलोट गर्दी झाली. पारंपारिक पेहराव करीत महिला या हळदीकुंकू समारंभामध्ये सहभागी झाल्या. एकमेकांना हळदीकुंकू लावून औक्षण करण्यात आले. त्यानंतर सौभाग्याचे व मानाचे वाण देण्यात आले. एक वेगळा उत्साह यानिमित्ताने पहावयास मिळाला. महिलांना बसण्यासाठी सुसज्ज अशी आसन व्यवस्था तयार करण्यात आली होती. भले मोठे मंडप उभारण्यात आले होते. यावर्षी कृषीवलमध्ये सन मराठी वाहिनीतील हुकुमाची रानी, तु अनोळखी तरी सोबती, इन्स्पेक्टर मंजू, तुझ्यासाठी तुझ्या संग या मालिकेतील सिनेतारकांना आमंत्रित केले होते. रायगड जिल्ह्यातील महिलांच्या हक्काचे व सौभाग्याचे प्रतिक समजल्या जाणाऱ्या हळदीकुंकूचा समारंभ शुक्रवारी (दि.१६)सायंकाळी चार ते सात यावेळेत साजरा करण्यात आला. सन मराठी वाहिनीतील हुकुमाची रानी ही या मालिकेतील वैभवी चव्हाण (रानी) अक्षय पाटील (इंद्रा), इन्स्पेक्टर मंजू मालिकेतील मोनिका राठी (मंजू), वैभव कदम (सत्या), तु अनोळखी तरी सोबती या मालिकेतील योगिता चव्हाण(अर्पिता), अंबर गणपुले (समीर) तसेच तुझ्यासाठी तुझ्या संग या मालिकेतील तेजा उर्फ अशोक फडदेसाई, अनुष्का गीते उर्फ वैदेही हे कलाकार उपस्थित होते. अलिबागमधील पीएनपी नाट्यगृहाच्या परिसरात हा सोहळा साजरा झाला. ग्रामीण भागातील खेड्यापाड्यातील महिलांसह शहरी भागातील हजारो महिला या समारंभात सहभागी झाल्या होत्या. सन मराठी वाहिनीवरील वेगवेगळ्या मालिकांमधील सिने तारकांशी गप्पागोष्टी करीत असताना त्यांच्यासोबत सेल्फीचा आनंद लुटला. मान्यवरांसह सेलिब्रिटींचे टाळ्याचा कडकडाट जल्लोषात स्वागत करण्यात आले.

दरम्यान पीएनपी नाट्यगृहाच्या प्रवेशद्वारासमोर सेलिब्रेटींचे आगमन होताच, पीएनपी होली चाईल्डमधील लेझीम पथकाने पारंपारिक पद्धतीने लेझीम वाद्यातून नृत्याचे सादरीकरण करीत त्यांचे स्वागत केले. कृषीवल हळदी कुंकू समारंभानिमित्त सौभाग्याचे वाण देण्याचा कार्यक्रम साजरा होत असताना खास महिलांसाठी वेगवेगळ्या प्रकारचे खेळ आयोजित केले होते. एक ते नऊ आकडे इंग्रजी व मराठीत बोलणे, उखाणे तसेच सध्या सोशल मिडीयावरील रिल्समधील गाणी आदी खेळ घेण्यात आले. या स्पर्धेमध्ये मोठ्या संख्येने महिला, तरुणींनी सहभाग घेतला. महिलांच्या हक्काचे व सौभाग्याचे प्रतीक समजल्या जाणाऱ्या हळदीकुंकू समारंभ महिलांसाठी एक पर्वणीच ठरली. कृषीवल हळदी कुंकू समारंभ निमित्त खास वेगवेगळ्या प्रकारचे स्टॉल उभारण्यात आले. त्यामध्ये ज्यांना चारचाकी गाडी घेण्याची आवड आहे. त्यांच्यासाठी वासन टोयेटो या कंपनीच्या कारचे स्टॉल होते. ज्यांना दुचाकी घेण्याची इच्छा आहे, त्यांच्यासाठी सुझूकी कंपनीची दुचाकी तसेच वेगवेगळ्या खाद्य पदार्थांचा आस्वाद घेणाऱ्यांसाठी सुहाना मसाले आणि राम बंधू मसाले यांचे स्टॉल होते. तसेच खोजाती फार्मचे स्टॉल होते. या स्टॉलमध्ये खरेदी करण्यासह दुचाकी व कारची बुकींग करण्यासाठीदेखील महिलांची गर्दी दिसून आली. दरम्यान कृषीवलच्या वतीने लकी ड्रॉ देखील ठेवण्यात आले होते.

१९९५ साली कृषीवल हळदी कुंकू या कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली. सुप्रिया पाटील यांनी हळदी कुंकू समारंभाच्या माध्यमातून जिल्ह्यातील सर्व महिलांना एकत्र आणण्याचे काम त्यावेळी केले. तोच वारसा चित्रलेखा पाटील जपण्याचे काम करीत आहेत. सुरुवातीला कृषीवल कार्यालयाच्या आवारात हा कार्यक्रम घेण्यात आला. त्यावेळी दोन हजार महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. महिलांच्या वाढत्या उत्साहातून या समारंभाची व्याप्ती प्रचंड वाढली आहे. ३० हजारहून अधिक महिला या समारंभाला दरवर्षी भेट देत विचारांची देवाण घेवाण करीत आहे. महाराष्ट्राची परंपरा जपणारा हळदीकुंकू सोहळा महाराष्ट्रातील नंबर एक म्हणून नावारुपाला येत आहे. ३१ वर्षापुर्वी सुरु केलेली चळवळ आज वेगळ्या उंचीबरोबरच वेगळ्या रुपातही दिसून येत आहे.

लोकसंसद

# 'मनुस्मृती'तील श्लोकाने मिळवून दिला विधवा स्त्रीला न्याय!

'यत्र नार्यस्तु पूजन्ते रमन्ते तत्र देवता।' असे संस्कृत वचन आहे याचा अर्थ असा की स्त्रीचा जिथे सन्मान राखला जातो तेथेच देवतांचा वास असतो. स्त्री ही सर्जनाची प्रतीक आहे. आदिशक्ती आदिमाया ही स्त्री रूपातच प्रकट होते. मनुस्मृतीत मनुने समाज सुसंस्कारित सुदृढ आणि निकोप रहावा यासाठी काही सूत्रे सांगितली आहेत. त्यामध्ये एक महत्त्वाचे सूत्र सांगितले आहे की स्त्री ही 'संरक्षित' असावी. याचा खरा अर्थ लक्षात न घेता पुरोगामी, साम्यवादी, आणि स्त्री मुक्तीवादी मनुने स्त्रीला बंधनात अडकवले आहे असा अपप्रचार करतात. आज 'लव्ह जिहाद'च्या रुपाने हिंदूंवर विशेषतः स्त्रियांवर भयानक संकट कोसळले आहे. स्त्री संरक्षित असणे फार महत्त्वाचे आहे. हेच सूत्र त्यामुळे अधोरेखित होते. भारतीय संस्कृतीत जे चार आश्रम सांगितले आहेत त्यामध्ये गृहस्थाश्रम हा महत्त्वाचा आश्रम असून उरलेल्या तीन आश्रमांना आधार देणारा आहे. कुटुंब व्यवस्था ही गृहस्थाश्रमाचे साकार रूप आहे. सध्या स्त्रीस्वातंत्र्य आणि व्यक्ती स्वातंत्र्य यांचा अयोग्य आणि घातक अर्थ लावला जात आहे. त्यामुळे कुटुंब व्यवस्था मोडकळीस आली आहे. त्यामुळेच मनोविकारांचे प्रमाण वाढले आहे. समाज अस्थिर झाला आहे. एकत्र कुटुंब पद्धतीत कुटुंबातील सर्व सदस्यांच्या सुखदुःखाचा विचार केला जातो. एकमेकांना आधार देणे, सहाय्य करणे आणि प्रोत्साहन देणे या गोष्टी संयुक्त कुटुंब पद्धतीत सहजतेने आणि सुरळीतपणे घडत असतात. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीचे दायित्व कुटुंबप्रमुखावर असते. अलिकडेच एका कौटुंबिक खटल्याची सुनावणी करताना कनिष्ठ न्यायालयाने 'सून जर सासऱ्यांच्या निधनानंतर विधवा झाली तर ती आश्रित ठरत नाही तिला सासरच्या संपत्तीतून पोटगी मिळू शकत नाही' असा युक्तिवाद केला. हा युक्तिवाद सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावला. विधवा स्त्रीला तिचा न्याय्य हक्क मिळायलाच हवा. तिच्या सासऱ्याचे निधन ती विधवा होण्यापूर्वी झाले की नंतर याचा संबंध तिच्या पोटगीशी जोडता येत नाही असा निर्णय दिला त्यामुळे तिचा पोटगीचा अधिकार अबाधित राहिला, तिला न्याय मिळाला. हा निर्णय देताना मनुस्मृतीतील एका श्लोकाचा दाखला देण्यात आला. जे कुटुंब प्रमुख त्यांच्या कुटुंबातील दुर्बल व्यक्तींचा सांभाळ करत नाहीत ते दंडास पात्र आहेत असा स्पष्ट नियम मनुस्मृतीत सांगितला आहे. भारतातील अनेक न्यायाधीशांनी न्यायदान करताना मनुस्मृतीतील श्लोकांचा आधार घेतला आहे कुटुंब व्यवस्था आणि पर्यायाने समाज सुदृढ भक्कम आणि निकोप राहण्यासाठी मनुस्मृतीत अनेक सूत्रे सांगितली आहेत. **श्रीमती संध्या काटदरे, माणगाव**

दिनविशेष

# कादंबरीकार काशीबाई कानिटकर

काशिबाई कानिटकर म्हणजे आधुनिक मराठी साहित्यातील आद्यलेखिका. आधुनिक मराठी साहित्यातील कादंबरी, चरित्र आणि कथा या साहित्यप्रकाराचे महिला म्हणून प्रथमतः लेखन केले आहे. काशिबाई या पंढरपूरचे कृष्णराव बापट यांच्या कन्या. त्यांचा जन्म २० जानेवारी १८६१ रोजी सातारा जवळील अष्टे या गावी झाला. त्यांच्या दोन भावांना शिकवायला पंतोजी येत, ते ऐकून, बघून त्या माहेरीच लिहायला शिकल्या. त्याकाळात स्त्रीशिक्षणाला विरोध होत असे. पण वडिलांच्या प्रोत्साहनामुळे त्या अशा पद्धतीने शिकल्या. पुढे स्वप्रयत्नाने मराठी, इंग्रजी, संस्कृत नाटके वाचून त्यांनी आपली आवड जोपासली. तत्पूर्वी वयाच्या ९ व्या वर्षी काशीबाईंचे लग्न वकील गोविंदराव कानिटकरांशी झाले. ते सुधारणावादी होते. हरिभाऊ आपटे, न्या. रानडे यांच्या सहवासामुळे स्त्रियांनी शिकावे अशा विचारांचे ते होते.

पण उघडपणे त्याकाळात काशीबाईंचे शिक्षण सुरू ठेवण्याची सोय नव्हती. पण तरीही काशीबाई टीका सहन करीत चोरून मारून शिकत, वाचत राहिल्या. गोविंदरावांसोबत त्या रविवारी दुपारी प्रार्थनासमाजातील सभांना जात असत, चर्चेत भाग घेत असत. घरी समजले की खूप गहजब होत असे. मग त्यांच्यावर घरातील अवघड व श्रमाची कामे लादण्यात येत असत. पण ते काहीही असले तरी त्यांना या प्रार्थना समाजातील व्याख्याने ऐकून शास्त्रीय विषयांची गोडी लागली. त्यांनी मराठीतील प्राथमिक शास्त्रीय पुस्तके वाचली.

तसेच मंडलिकांचा इतिहास, अर्थशास्त्र, कादंबरीसह भारतसार व पेशवे, होळकर, पटवर्धन, शिवाजी महाराज इ. बखरीही त्यांनी वाचल्या. याशिवाय कुमारसंभव, किरातार्जुनीय, मेघदूत या संस्कृत नाटकातील बरेचसे श्लोक त्यांनी तोंडपाठ केले होते. शाकुंतल, वेणीसंहार, मृच्छकटिक, मुद्राराक्षस इ. संस्कृत नाटकांचे वाचनही त्यांनी केले होते. इंग्रजीही त्या शिकत होत्या. गोविंदराव कानिटकर आणि काशीबाईंनी मिळून मनोरंजन आणि निबंधचंद्रिका नावाचे नियतकालिक सुरू केले. मनोरंजन, नवयुग आणि विविधज्ञानविस्तार आदी मासिकांमधून काशिबाईंचे स्फुटलेखन प्रसिद्ध झाले आहे. रंगराव (१९०३) व पालखीचा गोंडा (१९२८) या कादंबऱ्या आणि शेवट तर गोड झाला (१९८९), चांदण्यातील गप्पा (१९२१), शिळोप्याच्या गोष्टी (१९२३) हे कथासंग्रह त्यांचे प्रकाशित झाले आहेत. डॉ. आनंदीबाई जोशी :चरित्र व पत्रे या चरित्रात्मक पुस्तकाने साहित्यात त्यांना बरीच ख्याती मिळाली. हरीभाऊंची पत्रे हे त्यांचे पुस्तकही प्रसिद्ध आहे. डॉ. आनंदीबाईंच्या चरित्र लेखनाला हात घालण्याची आपली कुवत नाही, असे प्रामाणिकपणे म्हणतच, इंग्रजी शिकत, आनंदीबाईंसंबंधी देशभगिनीने लिहिणे कर्तव्य आहे या भावनेने त्यांनी डॉ. आनंदीबाई जोशींचे चरित्र लिहिले. काशीबाईंचे लेखन हे अनुभवावर आधारित असल्याने प्रत्ययकारी आहे. वर्णने लांबलचक, तपशीलवार असतात. पण त्यातही त्यांची सूक्ष्म निरीक्षण शक्तीच प्रत्ययाला येते. १९०६ मध्ये पुणे येथील ग्रंथकार संमेलनाचे गोविंदराव कानिटकर अध्यक्ष होते. त्या संमेलनाला त्या एकट्या स्त्री लेखिका उपस्थित होत्या. १९०९ मध्ये वसंत व्याख्यानमालेत काशीबाई अध्यक्ष होत्या. त्या पहिल्या स्त्री अध्यक्षा ठरल्या. पुणे सेवासदन संस्थेच्या स्थापनेमध्येही त्यांचा सहभाग होता. रमाबाई रानडे सेवासदनच्या अध्यक्षा तर काशीबाई उपाध्यक्षा होत्या. पंडिता रमाबाईंबरोबर काँग्रेसच्या दुसऱ्या अधिवेशनाला हजर असणाऱ्या आठ महिला सदस्यांपैकी महाराष्ट्रातील एकमेव हिंदू महिला-काशीबाई उपस्थित होत्या. अशा या महान लेखिकेचे ३० जानेवारी १९४८ रोजी निधन झाले.

# मासळीची आवक घटली

## • मांसाहारप्रेमींचे बजेट बिघडले



**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

समुद्रात वाऱ्याचा वेग वाढल्यामुळे मासळी स्थलांतरित झाली आहे. मच्छीमार नौकांना गेल्या चार दिवसांपासून मासळीच मिळत नाही. खोल समुद्रातही हीच अवस्था आहे. रोजच्या खर्चा इतकीही मासळी मिळेनाशी झाली आहे. त्यामुळे मार्केटमध्ये माशांचा तुटवडा निर्माण झाला आहे. सुट्टीत थंडीचा आनंद घेत पार्ट्यांचा बेत आखणाऱ्या मांसाहारप्रेमींचे बजेट बिघडले आहे. थंडीतील पार्ट्यांना महागाईची झळ बसली आहे. समुद्रात वाऱ्याचा वेग वाढल्यामुळे मार्केटमध्ये माशांचा तुटवडा निर्माण झाला आहे. आवक कमी झाल्याने बहुतांश माशांच्या दरात प्रतिकिलो २०० रुपयांची वाढ झाली आहे. त्याचवेळी चिकनचा दर २८० रुपये किलोवर गेला आहे. त्यामुळे रविवारी मुंबईकरांना जिभेचे चोचले पुरवणे चांगलेच महागडे ठरले.

मुंबईत थर्टी फर्स्ट'च्या आठवड्यापासून पार्ट्यां चालू होतात. घरोघरी तसेच मित्रमंडळी एकत्र येऊन चिकन पार्टीचे बेत आखतात. रविवारी अनेक कुटुंबात मांसाहार ठरलेलाच असतो. मात्र सध्या माशांचा तुटवडा निर्माण झाल्याने यावेळच्या रविवारी मुंबईकरांचा 'मूड ऑफ' झाला. माशांची आवक कमी झाल्याने पश्चिम उपनगरांतील अनेक मार्केटमध्ये मासेच मिळेनासे झाले. काही ठिकाणी विक्रीला ठेवलेले मासेदेखील दोन-तीन दिवसांपूर्वीचे होते. फ्रिजमध्ये ठेवण्यात आलेले मासे विकताना अनेक विक्रेते दिसले. मत्स्यप्रेमी फ्रिजमधील मासे खरेदी करण्यास नकार देत असल्याचे दिसून आले.

मासेमारीसाठी मच्छीमार खोल समुद्रात १४ ते १८ तासांपर्यंतच्या दूर अंतरावर जातात. तेथे वाऱ्याचा वेग जास्त असतो. या स्थितीत समुद्रात जाळी टाकता येत नसल्याने मासे कमी मिळतात. त्याचा परिणाम 'फिश मार्केट'मध्ये जाणवत आहे. नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये माशांचे प्रमाण जास्त होते. त्या तुलनेत आता तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे माशांचे दर प्रतिकिलो २०० रुपयांनी वाढले आहेत, असे ससून डॉक मच्छीमार बंदर बचाव कृती समितीचे पदाधिकारी कृष्णा पवळे यांनी सांगितले.

### चिकनबरोबरच अंड्यांचीही मागणी वाढली

'फिश मार्केट' मधील माशांचा तुटवडा चिकन विक्रेत्यांच्या पथ्यावर पडला. एक किलो चिकन २८० रुपयांना विकले जात होते. एरवी केवळ माशांना पसंती देणाऱ्या मुंबईकरांनी महागड्या दराने चिकन खरेदी केली. रविवारी सकाळी पूर्व व पश्चिम उपनगरातील चिकन विक्रेत्यांकडे गर्दी झाली होती. चिकनबरोबरच अंडय़ांचीही मागणी वाढल्याने अंड्यांच्या दरात वाढ झाली.

---

अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

**२० जानेवारी**

१) श्री.गजानन वासुदेव कावळे मु.नवगाव, अलिबाग, रायगड दि.२०-१-१९३७

२)श्रीम.अर्चना अच्युत म्हात्रे चेंढरे, अलिबाग दि.२०-१-१९५१

३)श्रीम.विमल नामदेव झेमसे अलिबाग, दि.२०-१-१९४१

४)श्री.विष्णु पुंडलिक पाटील श्रीबाग-२, अलिबाग दि.२०-१-१९४५

---

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

आजचे अन्नदाते



**कै. पार्वती गोपाळ वाटकरे, स्मरणार्थ, नवगाव, अलिबाग**

---

## प्रितेश पाटील यांचे निधन

**| वाघ्रण | प्रतिनिधी|**



अलिबाग तालुक्यातील वाघ्रण गावांतील श्री वाघेश्वर क्रिडा मंडळ तसेच जय हनुमान वाघ्रण क्रिकेट संघाचे क्रिकेटपट्टू रायगड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध टेनीस क्रिकेट पट्टू निखिल पाटील यांचे वरिष्ठ बंधू प्रितेश नरेश पाटील यांचे अल्पशा आजाराने रविवारी (दि.१८) पनवेल येथे उपचारादरम्यान निधन झाले. मृत्यूसमयी ते ४२ वर्षांचे होते. प्रितेश पाटील हे लघु व्यवसायिक होते. त्यांचा मोठा मित्र परिवार होता. ते खेळाडू होते. त्यांच्यावर वाघ्रणमधील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी गावासह पंचक्रोशीमधून खेळाडू वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. त्यांच्या पश्चात पत्नी, आई व दोन मुलं असा परिवार आहे. प्रितेश यांचे दिवसकार्य २७ जानेवारी रोजी होणार आहेत.

---

## पेढांबे येथे मोफत आरोग्य शिबीर

**| वाघ्रण | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील पेढांबे येथे कलाविश्व फाऊंडेशन अलिबागच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर पेढांबे येथील समाज मंदिरात शनिवारी (दि.१८) सकाळी १० ते १ दरम्यान पार पडले.

या शिबिराचे उद्घाटन उन्नती हॉस्पिटल अँड आसीयू पनवेलचे जनसंपर्क अधिकारी श्रीकांत किल्लेकर यांच्या हस्ते श्री गणेश प्रतीमेला हार घालून करण्यात करण्यात आले. सोबत वाघ्रण येथील पत्रकार दिपक पाटील, कलाविश्वचे संस्थापक प्रणित म्हात्रे, ग्रा.पं. सदस्य रुपेश पाटील, डॉ. समाधान पाटील आदी उपस्थित होते. या शिबिरात अनेकांची मोफत शुगर व रक्तदाब तपासणी करण्यात आली. तर गुडघेदुखी, मुत्राशयाचे विविध आजार व अन्य आजाराच्या रुग्णांची तपासणी करून त्यांना मोफत औषधे देण्यात आली. शिबिरासाठी उन्नती हॉस्पिटलच्या स्टाफ नर्स वर्षदा पाटील, प्रणिता भोईर, को ऑर्डीनेटर प्रतिक पाटील यांनी कामकाज केले. तर अर्पिता सिलधनकर, अजित पाटील, अविनाश आचरेकर आदीनी सहकार्य केले. कलाविश्व संस्थापक प्रणित म्हात्रे आणि सदस्य रुपेश पाटील यांनी डॉक्टर व संपूर्ण टिमचे आभार मानले आणि शिबिराची सांगता झाली.

---

## श्री मलंगगडावर फ्युनिक्युलर सेवा

**कल्याण :** श्री मलंगगडावर जाणाऱ्या भाविकांना मोठी सुविधा मिळणार आहे. देशातील सर्वात मोठ्या आणि लांब पल्ल्याच्या फ्युनिक्युलर ट्रॉलीचे काम पूर्ण झाले असून ही सेवा भाविकांच्या सेवेत दाखल झाली आहे. रविवारी या सेवेचे लोकार्पण करण्यात आले असून या फ्युनिक्युलर सेवेमुळे भाविकांना मलंगगडावर जाणं अधिक सोपं, सुरक्षित आणि जलद होणार आहे. विशेष म्हणजे, सुप्रीम कंपनीकडून भाविकांसाठी दोन दिवस ही सेवा विनामूल्य उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

---

## जिल्हा रुग्णालयाची इमारत रखडली



### • पालघरमधील रुग्णांची फरफट
### • योग्य वेळी उपचार मिळण्यास विलंब

**| पालघर | प्रतिनिधी |**

पालघरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम गेल्या चार वर्षांपासून रखडले आहे. त्यामुळे पालघरमधील रुग्णांची उपचारासाठी सुरतपर्यंत २०० किमी तर मुंबईपर्यंत १०० किमी इतकी फरफट होत आहे. गंभीर असलेले रुग्ण मुंबई, गुजरातच्या रुग्णालयात पोहोचेपर्यंत त्याचे प्राण कंठाशी येत आहेत. त्यामुळे रुग्णालय कधी पूर्ण होणार, असा संतप्त सवाल पालघरवासीयांनी केला आहे.

पालघर जिल्ह्यातील वाढणारी लोकसंख्या, वाढते औद्योगिकीकरण, आरोग्य विभागावर पडणारा ताण, आपत्कालीन सेवांची गरज ही बाब लक्षात घेऊन पूर्ण क्षमतेच्या जिल्हा रुग्णालयाची गरज आहे. त्यादृष्टीने २०२२ मध्ये या जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाला कार्यारंभ आदेश मिळाला आणि हे रुग्णालय २४ महिन्यांत पूर्ण होईल, अशी ग्वाही देण्यात आली होती. २०० खाटांच्या या जिल्हा रुग्णालयासाठी सुरुवातीला २०९ कोटी रुपये मंजूर करण्यात आले.

परंतु, बांधकाम खर्च वाढत गेला आणि या रुग्णालयाचा एकूण अंदाजित खर्च सुमारे साडेतीनशे कोटींपर्यंत गेला. निधीअभावी हे काम कासवाच्या गतीने सुरू आहे.

आतापर्यंत या इमारतीचे अवघे ६० ते ६५ टक्के इतकेच बांधकाम पूर्ण झाले आहे. जिल्हा प्रशासक मात्र त्याचे ८० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा करत आहे. ठेकेदार मात्र ८५ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाल्याचे ठोकून सांगत आहे. सध्या उपलब्ध असलेल्या आरोग्य संस्थांच्या जुन्या इमारतीची क्षमता अपुरी पडत आहे. त्यामुळे गंभीर रुग्णांना नाशिक, मुंबई, ठाणे किंवा गुजरातला पाठवावे लागत आहे. आपत्कालीन विभाग, अतिदक्षता विभाग, डायलिसिस आणि ट्रामाकेअर यांसारख्या अत्यावश्यक सुविधा खूपच मर्यादित असल्याने योग्य वेळी उपचार मिळण्यास विलंब होत आहे. त्यामुळे पालघरवासियांकडून संताप व्यक्त केला जात आहे.

---

## रक्तदान शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

**| खांब | प्रतिपिधी |**



तालुक्यातील खारगाव ग्रामपंचायत हद्दीतील गौळवाडी येथे स्वामी विवेकानंद जयंती निमित्ताने विविध धार्मिक उपक्रमांसह रक्तदान शिबीर आयोजित केले होते. श्री राधाकृष्ण युवा मंडळ, स्वामी विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूड संस्था आणि ज्ञान प्रबोधिनी पुणे व स्वर्गीय दत्ताजी तटकरे ब्लड बँक रोहा अष्टमी यांच्या संयुक्त विद्यमानाने आयोजित केलेल्या या शिबिराला रक्तदात्यांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाचे शुभारंभ ज्ञान प्रबोधिनी पुणे प्रतिनिधी ओंकार बाणाईत, विवेकानंद रिसर्च अँड ट्रेनिंग इन्स्टिट्यूड संस्थेचे सेक्रेटरी सुरेंद्र संघवी, प्रसाद दगडे, जेष्ठ नागरिक अनंत मेहेतर, सुधाकर चोगले, श्री राधाकृष्ण युवा मंडळ अध्यक्ष योगेश धुमाळ, सचिव प्रजेश वरणकर आदी मान्यवरांच्या शुभ हस्ते दीप प्रज्वलन, भारतमाता आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून करण्यात आला. या शिबिरात सुमारे ३५ रक्तदात्यांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान करून एक सामाजिक बांधिलकी जोपासली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मंडळाचे अध्यक्ष योगेश धुमाळ, सचिव प्रजेश वरणकर, प्रणय वरणकर आदींसह तरुण युवा मंडळाचे सदस्य सभासदांनी मोलाचे सहकार्य केले.

---

## यु.ई.एस.कॉलेजचे निवासी शिबीर संपन्न

**| उरण | प्रतिनिधी |**



यु.ई.एस. कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲण्ड टेक्नॉलॉजीच्या राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत सात दिवसीय निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. द्रोणागिरी हायस्कूल करंजा, उरण येथे दि.१२ जानेवारी ते १८ जानेवारी कालावधीमध्ये हे शिबीर पार पडले. या शिबिरामध्ये एकूण ५२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. संस्थेचे उपाध्यक्ष मिलिंद पाडगांवकर यांनी एनएसएसच्या विद्यार्थ्यांना एकत्रित कामाचे महत्त्व सांगितले. या शिबिरामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. मनोहर म्हात्रे यांनी विद्यार्थ्यांना आत्मसंरक्षण कसे करायचे, याचे प्रशिक्षण दिले. डॉ. सत्या ठाकरे यांचे करिअर मार्गदर्शनपर व्याख्यान झाले आणि रिलायन्स ॲनिमेशन ॲण्ड मीडिया टीमद्वारे ॲनिमेशन, व्हीएफएक्स, गेमिंग आणि कॉमिक्सवर माहितीपूर्ण सत्र यांसारखे अनेक उपक्रम राबवण्यात आले. हर्षद कोळी यांनी व्यवसाय कसा सुरू करावा, यावर व्याख्यान दिले. विद्यार्थ्यांनी शाळेतील भिंतींवर चित्रकला (वॉल पेंटिंग) केली. तसेच विद्यार्थ्यांनी स्वच्छ भारत, आपत्ती व्यवस्थापन आणि कचरा व्यवस्थापन यावर सामाजिक जनजागृती रॅलीचे आयोजन केले होते. एनएसएस स्वयंसेवकांनी शाळेतील मुलांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्श तसेच, इतर सामाजिक विषयांवर जागरूकतापर मार्गदर्शन केले. तर यु. ई. एस. संस्थेचे मानद सचिव ॲड. राजेंद्र भानुशाली यांनी जीवनविषयक तत्त्वज्ञान या विषयावर विद्यार्थ्यांना व्याख्यान दिले.

सात दिवस चाललेल्या या निवासी शिबिरामुळे विद्यार्थ्यांना विविध गोष्टींचे ज्ञान प्राप्त झाले. त्यांच्यामध्ये शिस्त निर्माण होऊन, जीवनाला बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन अजून सकारात्मक झाल्याचे दिसून आले.

---

## तिहेरी अपघातात टेम्पोचालक ठार

**रत्नागिरी :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील निवळी बावनदी येथील उतारावर भीषण अपघात झाला. ट्रेलरचालक मोहम्मद कासिम लियाज खान हा आपल्या ताब्यातील ट्रेलर घेऊन गोवा-मुंबई हायवेने भरधाव वेगाने जात होता. निवळी-बावनदी येथील उतारावर आला असता त्याने आपल्या पुढील दुचाकीला मागून धडक दिली. त्यानंतर पुढे जाऊन समोरून येणाऱ्या टेम्पोला समोरून जोरदार धडक दिली. यात टेम्पोचालक प्रणय काडगे गंभीर जखमी झाल्याने त्याचा मृत्यू झाला.

---

रत्नागिरी पोलिसांची 'स्मार्ट' कामगिरी | भारतातील पहिलाच प्रयोग

# एआयच्या मदतीने हरवलेल्या मुलीचा शोध

**| रत्नागिरी | प्रतिनिधी |**

आधुनिक तंत्रज्ञानाचा कल्पक वापर करत रत्नागिरी पोलीस दलाने एका हरवलेल्या मुलीचा यशस्वी शोध घेतला आहे. पोलीस अधीक्षक नितीन बगाटे यांच्या संकल्पनेतून विकसित झालेल्या 'रेड्स' या एआय आधारित ॲपमुळे हा तपास अवघ्या काही दिवसांत पूर्ण झाला.

१२ जानेवारी रोजी रत्नागिरी शहर पोलीस ठाण्यात एक मुलगी हरवल्याची तक्रार दाखल झाली होती. या प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी पारंपारिक पद्धतींसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा आधार घेतला. मुलीचे छायाचित्र रेड्स ॲपमधील 'मिसिंग पर्सन्स' विभागात अपलोड करण्यात आले. देव-दृष्टी प्रणालीच्या साहाय्याने त्या एका छायाचित्रावरून तब्बल १०८ वेगवेगळ्या एआय जनरेटेड प्रतिमा तयार करण्यात आल्या. यामुळे मुलीचा चेहरा वेगवेगळ्या कोनातून किंवा वेशभूषेत कसा दिसू शकतो, याचा अंदाज पोलिसांना आला.

या तांत्रिक विश्लेषणातून मिळालेल्या माहितीच्या आधारे संबंधित मुलगी नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी रेल्वे स्थानक परिसरात असल्याची माहिती मिळाली. पोलीस अधीक्षक नितीन बगाटे आणि अपर पोलीस अधीक्षक बी.बी. महामुनी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विवेक पाटील व त्यांच्या पथकाने तातडीने इगतपुरी गाठून मुलीला सुखरूप ताब्यात घेतले. संबंधित मुलीस रत्नागिरीत आणून सुरक्षितपणे तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले. रत्नागिरी पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.

### तपासाला नवीन दिशा

रत्नागिरी पोलिस दलाने एआय तंत्रज्ञानाचा वापर करुन रत्नागिरी ॲडव्हान्स इंटेग्रेटेड डाटा सिस्टीम हे नावीन्यपूर्ण डिजिटल ॲप्लिकेशन विकसित केले आहे. त्यामुळे तपासामध्ये गती आणि नेमकेपणा येणार आहे. या ॲपचा पहिल्यांदाच वापर करत रत्नागिरी शहर पोलिसांनी जिल्ह्यातील एका हरवलेल्या मुलीचा शोध घेतला आहे. त्यामुळे ॲपची उपयुक्तता सिद्ध झाली आहे. तपासासाठी कृत्रिम बुध्दिमत्तेचा वापर केलेला हा भारतातील पहिलाच प्रयोग असून, त्याव्दारे तपासात नवीन दिशा पोलीस विभागाला दिली असल्याची माहिती पोलिस अधीक्षक नितीन बगाटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

### या ॲपमध्ये आहेत तीन प्रकार

१)देव दृष्टी: या तंत्रज्ञानाचा वापर करून जिल्ह्यामधील मिसिंग असणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्यात येऊ शकतो व जिल्ह्यामधील हिस्ट्री शिटर्स, वॉन्टेड आरोपी, एनडीपीएसमधील आरोपींचे फोटो या ॲपमध्ये डेटाबेस स्वरूपात आहेत. या ॲपद्वारे कृत्रिम बुध्दिमत्ता तंज्ञज्ञानाचा वापर करून आरोपींचे विविध १०८ प्रकारचे इमेजेस बनवले जाऊ शकतात.

२)देव रुपरेखा: यामध्ये आरोपी फक्त कुणाला तरी दिसले आहेत किंवा त्यांचा पोलिस स्टेशनमार्फत एका पोलिस स्केच आर्टिस्टकडून स्केच तयार करण्यात आलेला आहे. किंवा एखादा मृतदेह,सडलेले मानवी शरीर किंवा सांगाडा याचा फोटो असला तरी हा फोटो देव रुपरेखामध्ये अपलोड करुन त्याची नवीन इमेज तयार करता येते.

३) बी. एन.एस अनॅलिसिस : यामध्ये पोलीस कामकाजात वापरासाठी भारतीय न्यास संहिता, २०२३मध्ये एखादे कलम ओळखता आले नाही, तर या ॲप्लिकशनमधील सर्व बारमध्ये फक्त केलेल्या गुन्ह्याचे वर्णन लिहिले तर लागलीच त्यामध्ये कलम सहित सजेशन येते. त्यामुळे हे ॲप तपास कामासाठी उपयोगी ठरत आहे.

---

# निवडक

## लग्नाचे आमिष दाखवून लैंगिक अत्याचार

**चिपळूण :** चिपळूणमध्ये एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून, धमक्या देऊन वारंवार जबरदस्तीने शारीरिक संबंध ठेवून तिला गर्भवती केल्याच्या धक्कादायक प्रकार घडला आहे. एप्रिल २०२५ ते ऑगस्ट २०२५ या कालावधीत हा प्रकार घडला आहे. मंदार मंगेश कदम असे संशयित आरोपीचे नाव असून त्याच्याविरोधात चिपळूण पोलीस ठाण्यात पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित अल्पवयीन मुलीने चिपळूण पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, मंदार कदम याने तिला लग्नाचे आश्वासन देऊन फसवले. तसेच धमकावून तिचे अनेकदा शारीरिक शोषण केले. यामुळे ती गर्भवती झाली. पीडितेच्या तक्रारीनुसार पोलिसांनी तात्काळ कारवाई करून संशयित मंदार कदम याला ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या तपासादरम्यान संशयिताच्या मोबाईलमधून अनेक संशयास्पद माहिती समोर आली असून, तो गांजा सेवन करणारा असल्याचीही माहिती पुढे आली आहे. यामुळे त्याच्याविरोधात आणखी काही प्रकरणे उघडकीस येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी सुरू केली असून पोलीस पीडितेच्या वैद्यकीय तपासणी आणि इतर पुराव्यांचा अभ्यास करत आहेत.

## साई पालखी सोहळा उत्साहात



**तळा :** तळा शहरातील ओम साईराम सेवा मंडळातर्फे साई पालखी सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी वर्षाच्या सुरुवातीस तळा ते श्री क्षेत्र शिर्डी पायी पदयात्रेचे आयोजन करण्यात येते. यामध्ये झोळी दर्शन, साई पालखी मिरवणूक, अखंड पारायण, भजन, महापूजा, होमहवन, आरती, साई भंडारा असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडतात. त्यानुसार दि.१९ जानेवारी रोजी साई पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पायी पदयात्रा करून आलेले साईभक्त तसेच शहरातील नागरिक व महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्या होत्या. पारंपरिक खालू बाजा व भजनाच्या तालावर तसेच ओम साईराम च्या जयघोषात साईभक्त तल्लीन झाले होते. तळा बाजारपेठेत नागरिकांनी दर्शन घेतल्यानंतर साईंची पालखी पंचपरमेश्वर मंदिराकडे मार्गस्थ झाली.

## आस्था थिटे पुरस्काराने सन्मानित



**कोलाड :** रोहा तालुक्यातील नवजीवन शिक्षण प्रसारक मंडळ खांब संचलित श्रमिक विद्यालय चिल्हे येथे इ.८ वी मध्ये शिक्षण घेत असलेली विद्यार्थीनी आस्था विनोद थिटे हिचा राज्यस्तरीय गुणवंत विद्यार्थी पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. अष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई या राष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थेच्या वतीने आस्था थिटे हिचा आळंदी येथे संपन्न करण्यात आलेल्या एका शानदार कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष शिवाजी खैरे, कार्याध्यक्ष प्रदीप बोराटे, कोषाध्यक्ष अनुसया खैरे, उपाध्यक्ष निलेश कसबेकर, सचिव सविता पाटील, रोहिदास भालशंकर आदी मान्यवरांच्या हस्ते तिला सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. अष्टपैलू संस्कृती कला अकादमी मुंबई यांच्या वतीने जुलै ते नोव्हेंबर महिन्यात घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये तिने चमकदार कामगिरी केल्याबद्दल तिचा सन्मान करण्यात आला आहे. तिच्या या सुयशाबद्दल संस्थेचे चेअरमन महेंद्र पोटफोडे व सर्व संचालक मंडळ, मुख्याध्यापक दिपक जगताप व सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी वर्ग यांनी तिचे अभिनंदन व्यक्त करून शुभेच्छा दिल्या.

## 'तरुणांसाठी प्रेरणा' विषयावर कार्यक्रम



**कोलाड :** कोलाड हायस्कूल येथे रविवारी (दि.१८) सुदर्शन कंपनीच्या उपक्रमांतर्गत 'तरुणांसाठी प्रेरणा' या विषयावरील कार्यक्रम अतिशय प्रेरणादायी व उत्साही वातावरणात संपन्न झाला. या आयोजित कार्यक्रमात सर्व उपस्थितांना मार्गदर्शन करतांना किशोर काळोखे सर यांनी टिम वर्कचे महत्व, तसेच रेस्क्यू टिम कार्य करतांना मानसिक आरोग्य कसे मजबूत ठेवावे, या विषयावर अत्यंत मौल्यवान व अनुभव आधारित प्रेरणादायी विचार मांडले. यावेळी सुदर्शन कंपनीचे सीएसआर एक्झिक्युटिव्ह अमर चंदणे, रेस्क्यू टीमचे अध्यक्ष सागर दहिंबेकर तसेच रेक्यू टिमचे असंख्य सदस्य उपस्थित होते. मुख्य प्रवक्ते किशोर काळोखे यांच्या प्रेरणादायी विचारामुळे तरुणांमध्ये आत्मविश्वास वाढून ध्येय निश्चित करण्यासाठी प्रेरणा मिळाली. तसेच, उज्वल भविष्यासाठी सकारात्मक व वास्तववादी दृष्टिकोन विकसित होण्यासाठी जरूर मदत होईल. या कार्यक्रम तरुणांसाठी नवीन दिशा देणारा ठरणार असून या उपक्रमाचे उपस्थितांकडून मनापासून कौतुक करण्यात आले.

## वावे येथे विनामूल्य आरोग्य शिबीर

**पाली/गोमाशी :** रोटरी क्लब ऑफ ग्रीन सिटी ठाणे व सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ सुवर्ण महोत्सवी वर्ष संकल्पना अंतर्गत सुधागड तालुक्यातील वावे येथे रविवारी विनामूल्य आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या आरोग्य शिबिरात ठाण्यातील नामवंत डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून रुग्णांना मोफत औषधेही देण्यात आली. या शिबिरात वावे, रासळ, चिवे, जांभूळपाडा पंचक्रोशीतील शेकडो नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आरोग्य शिबिराचा लाभ घेतला. सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे अध्यक्ष विठ्ठल घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच रोटरी क्लब ऑफ ग्रीन सिटी ठाणे अध्यक्ष सुरेश कल्याणकर, सचिव जितेंद्र कुलकर्णी यांच्या उपस्थितीत डॉ. श्रीपाद बोडस, फिजिशियन डॉ. नीता पाटील, एनटी सर्जन डॉ. कौशिक पेढामकर, डॉ. सिंग, डॉ. आकांक्षा यांनी रुग्णांची तपासणी केली. सिनिअर नर्स प्रिया शिंदे यांनी रुग्णाची मधुमेह तपासणी व रक्तदाब तपासणी केली. तर संग्राम जोशी यांनी रुग्णांना लाखो रुपयांची औषधे मोफत पुरविली. तसेच रोटरी क्लबचे मोहन तेलंग, उदय पाटील, वैभव नारकर यांनी सहकार्य केले. या शिबिरासाठी सुधागड तालुका रहिवासी सेवा संघ ठाणे संस्थेने आणि वावे ग्रामस्थ मंडळ यांनी विशेष मेहनत घेतली.

## निवडक



### 'टेकफेस्ट'चा उत्साहात समारोप

**तळा :** श्री गोपीनाथ महादेव वेदक प्रतिष्ठान संचलित जी. एम. वेदक कॉलेज ऑफ सायन्स, तळा येथील माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने आयोजित चारदिवसीय 'टेकफेस्ट' या तांत्रिक महोत्सवाचा उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वी समारोप झाला. या उपक्रमासाठी संस्थापक अध्यक्ष डॉ. नंदकुमार वेदक व उन्मेश वेदक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. या कार्यक्रमाचे उद्‌घाटन पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सचिन बंगाळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत केले. 'टेकफेस्ट' अंतर्गत मॉडेल प्रदर्शन, पोस्टर स्पर्धा, प्रोग्रामिंग व कोडिंग स्पर्धा, प्रेझेंटेशन तसेच कार्टून स्पर्धा अशा विविध तांत्रिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. टेकफेस्टमध्ये उल्लेखनीय कामगिरी करत रोहन आचार्य याने टेकफेस्ट किंग तर रिद्धी पाटील हिने टेकफेस्ट क्वीन हा मान पटकावला.त्यांच्या यशाबद्दल उपस्थित मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले. टी. वाय. बी.एस्सी. (आयटी)वर्गातील विद्यार्थ्यांनी या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व संचालन केले होते. मनस्वी वाढवळ, अवनी अंबुर्ले, प्रा. रिया राजपुरकर, प्रा. पल्लवी भट, प्रा. निहारिका अडुळकर, प्रा. फराह गोठेकर, प्रा. गौरी वेदपाठक यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

### हिराजी पाटील यांना अभिवादन

**नेरळ :** हुतात्मा हिराजी पाटील यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त मानिवली गावातील हुतात्मा स्मारकात शालेय विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून अभिवादन केले. मानिवली ग्रामपंचायत आणि हुतात्मा स्मारक समिती फाऊंडेशन यांच्या वतीने सोहळ्याचे आयोजन केले होते. जयंती सोहळ्याचे आयोजन मानिवली येथील हुतात्मा हिराजी पाटील स्मारकात केले होते. १९ जानेवरी १९१४ रोजी जन्मलेले हिराजी पाटील यांचे देश पारतंत्र्यात असताना २ जानेवारी १९४३ रोजी बलिदान झाले होते. त्यांची जयंती मानिवली हुतात्मा स्मारकात मानिवली ग्रामपंचायत आणि मानिवली हुतात्मा स्मारक समिती फाऊंडेशनतर्फे केले होते. यावेळी त्यांच्या अर्ध पुतळ्याला विठ्ठल गवळी यांचे हस्ते पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेचे अध्यक्ष संतोष पेरणे, प्रवीण डायरे, पद्माकर म्हात्रे, नारायण सोनावणे, लहूदास डायरे, जितेंद्र गवळी, मनोहर डायरे, दिनेश गवळी, जयराम गवळी, प्रीतम डायरे, गायकर, गवळी पाटील उपस्थित होते. मानिवली ग्रामपंचायत हद्दीमधील वरई, अवसरे, निकोप आणि मानिवली शाळेतील विद्यार्थ्यांनी समूह गीते, पोवाडे सादर केली.




### राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा यशस्वी

**माणगाव :** माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे महाविद्यालय, माणगाव-रायगड येथे महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य प्राध्यापक विकास अकादमी, पुणे यांच्या सहकार्याने तसेच पी. एम. उषा योजनेअंतर्गत (दि.१६) जानेवारी रोजी शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण व विकास कार्यक्रम या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेचे आयोजन ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्‌घाटन गीता तटकरे, डॉ. हेमंत गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी शामकांत दौंडकर, डॉ. नितीन सोनाजे, प्रा. डॉ. विलास पाध्ये, डॉ. एस. एम. जाधव, डॉ. प्रसाद कुलकर्णी, प्रा. डॉ. शुभांगी पिंगुलकर, डॉ. योगेश बोराळे, डॉ. सचिन बंगाले आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेमध्ये कार्यालयीन प्रक्रिया व प्रशासन, दस्तऐवजीकरण कौशल्ये, डिजिटल कौशल्ये व प्रभावी संवाद कौशल्ये, विद्यार्थी सेवा तसेच तणाव व्यवस्थापन विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. या प्रशिक्षणामुळे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, व्यावसायिक कौशल्ये आणि सेवा गुणवत्तेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

### साई भक्तांची आरोग्य तपासणी शिबीर

**कर्जत :** स्वामिनी चॅरिटेबल ट्रस्ट आणि रायगड हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शिर्डी येथे पायी वारीने जाणाऱ्या साई भक्तांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन रविवारी (दि.१८) जानेवारी रोजी कर्जत येथे करण्यात आले होते. शिबिराचे उद्‌घाटन



नगराध्यक्षा पुष्पा दगडे यांच्या हस्ते झाले. शिबीर यशस्वी होण्यासाठी शिल्पा दगडे यांनी मेहनत घेतली. ट्रस्टच्या रेखा गोरे, यशवंत भाबल, दीपक कुलकर्णी, महेंद्र चंदन, प्रशांत पाटील, सुवर्णा जोशी, संतोष दाभणे, आशिष कोल्हे, दीपक जाधव, सागर चौधरी, गौरव लाड, शैलेश मिसाळ, अनुकूल कदम, सागर तुपे, राजा लबडे उपस्थित होते. या आरोग्य तपासणी शिबिराचा १५० हून अधिक साई भक्तांनी लाभ घेतला.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- बागायती वाडी विक्री -१३ गुंठे (घर, नारळ, सुपारी, विहीर) @ २७ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक - सुहास माळी गाव- थळ, गुंजाळ आळी, अलिबाग मो. - ८७७९८०५३५३
- ऑफिस कामाकरिता अनुभवी कॉम्प्युटर ऑपरेटर , ऑफिस असिस्टंट मुलगा व रिसेप्शनिस्ट मुलगी पाहिजे. शिक्षण - ग्रॅज्युएशन पूर्ण. Typing, MS-CIT. संपर्क - सौ.रेश्मा पाटील पत्ता- अलिबाग ७०८३३९९५३३ वेळ - ११.०० ते५.००
- नागाव मधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे . रिसेप्शनिस्ट, १ ते ३ वर्षे अनुभव असणाऱ्यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- सिव्हील इंजिनियरींग ऑफिसमध्ये कामाकरीता ड्राफ्टसमन (Autocad) पाहिजे. फोन नं. ८३०८२००७७७/७७५८०६४७७३/ ९६६५०६७९१७

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# वाहतूक कोंडीत अडकले पर्यटक

## राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त वाहनतळ आवश्यक; २५-२६ जानेवारीला योग्य नियोजनाची गरज

**| महाड | प्रतिनिधी |**

छत्रपती शिवाजी महाराजांची ऐतिहासिक राजधानी असणाऱ्या किल्ले रायगडावर रविवारी सुट्टीचा दिवस व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महानगरपालिकेच्या निवडणुकीत निवडून आलेले विजयी उमेदवार व कार्यकर्त्यांच्या रायगड किल्ल्यावरील भेटीमुळे पर्यटक व शिवभक्तांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागला.



किल्ले रायगड परिसरात रायगड प्राधिकरण व राज्य शासनाने तातडीने वाहनतळ उभारण्याची प्रक्रिया चालू करून स्थानिकांना दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडीच्या त्रासातून सुटका करा अशी मागणी वैभव देशमुख व शिराज सय्यद यांनी प्रशासनाकडे केली आहे

किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांमुळे वाहतूक कोंडीचा पुन्हा एकदा सामना प्रशासनाबरोबरच पर्यटकांना देखील करावा लागल्यामुळे वाहतूक कोंडीतून मार्ग काढताना किल्ल्यावर जाण्यासाठी लगबग बघता पर्यटकांची दमछाक झाली होती.

रायगडावर सुट्टीच्या दिवशी हजारो पर्यटक व शिवभक्त येत असतात. मात्र, पोलीस यंत्रणा व स्थानिक प्रशासनातील समन्वयाच्या तसेच नियोजन शून्यतेच्या अभावामुळे वाहतूक कोंडी झाली होती. त्याचीच पुनरावृत्ती पुन्हा एकदा २४, २५, २६ जानेवारी रोजी सलग सुट्टी तसेच २४ व २५ जानेवारी रोजी छत्रपती संभाजी महाराजांचा तिथीप्रमाणे असणारा राज्याभिषेक सोहळा पाहता रायगडावर येणाऱ्या पर्यटकांना व शिवभक्तांना पुन्हा मोठ्या वाहतूक कोंडीचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे

पाचाड पासूनच हिरकणी वाडीपर्यंत ते चित्त दरवाजा ते नाणे दरवाजापर्यंत रस्ता चिंचोळा व उताराचा असल्याने येणारे पर्यटकांच्या गाड्या या रस्त्यावर उभ्या राहत असल्याने रायगड किल्ल्याच्या प्रवेशद्वारापासून छत्री निजामपूरपर्यंत जाणाऱ्या एसटी बस, त्या गावापर्यंत जात नसल्याने स्थानिक ग्रामस्थांना सुमारे सात ते आठ किलोमीटरची पायपीट करीत गावात जावे लागली. याचा परिणाम वृद्ध व अपंग व्यक्ती तसेच शालेय, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना याचा फटका बसत आहे.

> "किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या हजारो शिवभक्तांबरोबरच देश विदेशातून पर्यटक रायगडावर येत असतात. शासनाने किल्ले रायगडाकडे जाणाऱ्या रोपवे फाटा म्हणजेच वाय सेक्शन, जिजामाता वाडा व जिजामाता समाधी या ठिकाणी वाहनतळ उभारण्याची घोषणा केली होती. त्यासाठी आवश्यक असणारी जमीन देखील संपादित केल्याचे सांगण्यात येते. मात्र, प्रत्यक्षात अजून त्या कामाला प्रत्यक्ष मुहूर्त लागत नसल्याने वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे."
>
> – रघुवीरजी देशमुख
> व्यावसायिक संघटनेचे अध्यक्ष

## चंद्रकांत भोईर यांचा सत्कार

**| रसायनी | प्रतिनिधी |**

पळस्पे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच चंद्रकांत भोईर यांना त्यांच्या समाजोपयोगी कार्याची दखल घेत अमेरिका इंटरनॅशनल युनिव्हर्सिटी (दिल्ली) यांच्याकडून सोशल वर्क क्षेत्रातील मानद डॉक्टरेट पदवी प्रदान करून सन्मानित करण्यात आले.




आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पुरस्कारामुळे संपूर्ण पनवेल तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे. खेळाडू म्हणून कारकीर्द सुरू करून पुढे आदर्श सरपंच व संवेदनशील लोकनेता म्हणून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.


सामाजिक बांधिलकी, विकासात्मक दृष्टीकोन, दानशूर वृत्ती आणि माणुसकीची जाणीव यांचा संगम त्यांच्या कार्यात दिसून येतो. त्यांच्या या लोककल्याणकारी कार्याला या मानद डॉक्टरेट पुरस्काराने आंतरराष्ट्रीय पातळीवर मान्यता मिळाली आहे. त्यांचा सन्मान झाल्यामुळे परिसरातील मान्यवरांनी त्याचे अभिमंदन केले.

## ज्ञानेश्वर पोलेकर यांचे निधन

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन दांडा येथील ज्ञानेश्वर (नाना) गोपाळ पोलेकर यांचे वयाच्या सत्तराव्या वर्षी आकस्मिक निधन झाले. नाना या नावाने तालुक्यात प्रसिद्ध असणारे ज्ञानेश्वर पोलेकर हे श्रीवर्धन नगरपरिषद



माजी नगरसेवक तसेच श्रीवर्धन तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे उपाध्यक्ष पद भूषविले होते. समाजसेवेशी निगडित नाना यांनी गरजु व्यक्तींना सढळ हस्ते मदत केली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना, दोन मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे.





● लोकनेते स्वर्गीय दिनकर बाळू पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पनवेल येथील आगरी समाज मंदिरात यांच्या प्रतिमेची भव्य रांगोळीच्या माध्यमातून यांना आदरांजली वाहण्यात आली. भव्य रांगोळी श्रीवर्धन येथील सुप्रसिद्ध, रंगावलीकार, वीरेश दत्तात्रय वाणी यांनी साकारली आहे.

## चिरनेरमध्ये माघी गणेशोत्सवाची लगबग सुरू

**| उरण | प्रतिनिधी |**

माघी गणेशोत्सव २२ जानेवारी रोजी मोठ्या जल्लोषात साजरा केला जाणार आहे. त्यासाठीची जय्यत तयारी उरण तालुक्यातील चिरनेर, सोनारीसह इतर गावांमध्ये सुरू असून कला केंद्रांमध्ये आता लाडक्या बाप्पांच्या मूर्तीवर अखेरचा हात फिरवण्याचे काम ही अंतिम टप्प्यात आले आहे. अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या माघी गणेशोत्वासाठी श्री गणपती देवस्थान विश्वस्त मंडळ चिरनेरने मंदिर परिसरात आकर्षक मंडप डेकोरेशन सुरु केले आहे.



तसेच सोनारी येथील सिद्धिविनायक मंदिरात गणेशोत्सव मंडळाच्या वतीने सन २०२६ या दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले आहे.

गणेशभक्तांमध्ये माघी गणेश जयंतीला एक वेगळे महत्त्व असून राज्यातील विविध भागांत मोठ्या थाटामाटाने साजरी केली जाते. यंदा गुरुवार (दि.२२) जानेवारी रोजी गणेश जयंती आली असून त्याआधी भाविकांमध्ये चैतन्याचे वातावरण निर्माण झाले आहे.चिरनेर गावातील श्री महागणपती मंदिरांमध्ये माघी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून साजरा केला जातो. तसेच उरण तालुक्यातील सोनारी, उरण शहर, केगांव विनायक, बोकडविरा, खोपटा, दिघोडे-रानसई, नागाव गावातील मंदिरात ही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करत माघी गणेशोत्सव साजरा केला जात आहे.

चिरनेर गावातील श्री गणपती देवस्थान विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष महेंद्र पाटील, मंगेश पाटील, अमर ठाकूर, सुजित पाटील, किरण भाकुर्लेकरसह गाव कमिटीचे सदस्य यांनी मंदिर परिसरात जय्यत तयारी सुरू केली आहे. तसेच सोनारी गावातील श्री सिद्धिविनायक देवस्थानचे पदाधिकारी तुकाराम कडू, राकेश कडू, दिनेश तांडेलसह गणेशोत्सव मंडळाचे इतर सदस्य विविध कार्यक्रमांचे आयोजन करणार आहेत.

## रिक्षा चालकांची आरोग्य तपासणी

**| नेरळ | प्रतिनिधी |**

नेरळ गावातील नेरळ मल्टिसुपरस्पेशलिटी हॉस्पिटलच्या माध्यमातून नेरळ परिसरातील रिक्षा आणि टॅक्सी चालकांच्या सर्व रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटना चालकांची आरोग्य तपासणी करण्यात आली. नेरळ येथील सर्व रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटना आणि कुटुंब यांच्यासाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर आणि सीपीआर फर्स्ट ॲण्ड प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. यावेळी डॉ. विवेक भगत, डॉ. दीपक सिंग यांच्या माध्यमातून हे शिबीर आयोजित करण्यात आले होते. टॅक्सी चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष रमेश कडव, भगवान जामघरे, आत्माराम डांगरे, भरत डायरे, चंद्रकांत जाधव, शरद म्हसे, संभाजी हरपुडे, अरुण गायकवाड आणि अनेक रिक्षा संघटना यांचे पदाधिकारी उपस्थित होते. डॉ विवेक भगत डॉ दीपक सिंग, डॉ. हेमंत हिंगोले. तसेच नेरल मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटलची संपूर्ण टीमकडून मार्गदर्शन तसेच आरोग्य तपासणी करण्यात आले. या शिबिरामध्ये शुगर, ब्लड प्रेशर, ईसीजी, एक्स-रे तपासणी करण्यात आल्या.

## नेरळ पोलीस ठाण्यास जनजागृती फलकांचे वाटप

**| नेरळ | प्रतिनिधी |**

रस्त्यावरील वाढते अपघात रोखण्यासाठी आणि नागरिकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी नेरळ पोलीस ठाणे आणि जिल्हा वाहतूक शाखा यांच्या वतीने विशेष मोहीम हाती घेण्यात आली आहे. या मोहिमेला बळ देण्यासाठी मालेगाव-नेरळ येथील निलेश सुभाष भोईर यांनी सामाजिक बांधिलकी जपत वाहतूक नियमांचे प्रबोधन करणारे माहिती फलक




पोलीस प्रशासनाला भेट देण्यात आले. तसेच हे फलक नेरळ पोलीस ठाण्यामध्ये पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आले. दरम्यान, फलकांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली आहे. कर्णकर्कश सायलेन्सर मोटारसायकलला लावून आवाज करणाऱ्यांवर १०,००० रुपये दंडाची तरतूद, मद्यपान करून गाडी चालवणाऱ्यांवर ड्रिंक ॲण्ड ड्राईव्ह विरुद्ध १०,००० रुपये दंडाचा इशारा तसेच नो पार्किंग क्षेत्रात वाहन उभे केल्यास ५०० ते १५०० रुपयांपर्यंतचा दंड. आशा सर्व दंडांचे फलक हे देण्यात आले.

सामाजिक बांधिलकी दाखवत भोईर आणि भगत यांनी हे फलक पोलीस ठाण्याला भेट दिले आहेत. यापूर्वी कर्जत एसटी आगारासाठी देखील प्रवासी मार्गांचे फलक देण्यात आले होते.

याप्रसंगी प्रभारी अधिकारी राहूल वरोटे, नितिन मंडलीक, नितिन आहेरे, युवराज साळुंखे, निलेश भोईर, दिपाली भगत उपस्थित होते. या उपक्रमाचे कौतुक केले असून, नागरिकांनी दंडाच्या कारवाईला घाबरण्यापेक्षा स्वतःच्या आणि इतरांच्या सुरक्षिततेसाठी वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## गुणवंताचा सत्कार

**रसायनी :** विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या माध्यमातून यशस्वी आयुष्य घडवावे तसेच समाजाप्रती आपली जबाबदारी जपावी, या उद्देशाने निर्मला फाऊंडेशन, गुळसुंदे यांच्या वतीने रसायनी परिसरातील विविध शाळांमधील एसएससी परीक्षा २०२५ मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात गुळसुंदे हायस्कूल, आपटे विद्यालय, सावळे विद्यालय, चावणे विद्यालय, वाशिवली विद्यालय, जनता विद्यालय (मराठी व इंग्रजी माध्यम), तसेच रिलायन्स फाऊंडेशन स्कूल येथील प्रथम तीन क्रमांक प्राप्त २९ गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास मोहन कोंगेरे, गोपाळ सुरवसे, देवा पाटील, पद्माकर झिंगे, राहुल चिपळेकर आदी मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी पद्माकर झिंगे, कैलास रायकर, के. एफ. मुल्ला, व रूपाली काळे यांना गुणवंत शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रूपाली पाटील व सृष्टी पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रशांत पाटील यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निर्मला फाऊंडेशनचे उपाध्यक्ष विकास पाटील, रुबेन पाटील, रूपम पाटील, कल्पना पाटील, प्रियंका पाटील व वृषाली ठोंबरे यांनी सहकार्य केले.

### पाण्यात काढलेली रांगोळी आकर्षक ठरली | ४२ विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धेत सहभागी

## पद्मदुर्ग किल्ल्यात शौर्यगाथाचे संमेलन

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरुड समुद्रकिनारापासून तीन किलोमीटर अंतरावर अरबी समुद्रात राजे शिवछत्रपती महाराजा व शंभुराजे आणि जिगरबाज मावळयांनी पद्मदुर्ग किल्ल्याचीनिर्मिती केली होती. आज ३५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त मुरूड येथील पद्मदुर्ग शौर्यगाथा ऐतिहासिक संमेलन शिवप्रेमी मंच यांनी पद्मदुर्ग किल्ल्यात शौर्यगाथा ऐतिहासिक संमेलन आयोजन करण्यात आले होते.



यावेळी इतिहास अभ्यासक आप्पासाहेब परब, सरसेनापती हंबीरराव मोहिते यांचे वंशज विक्रमसिंह मोहिते, पद्मदुर्ग आरमार अधिकारी लायजी सरपाटील यांचे वंशज निलेश सरपाटील, शिवाजी स्मारक मंडळाचे कार्यावाह सुधीर थोरात, प्रवेश पालशेतकर, अनिकेत पाटील, अतुल मोरे, पंकज भोसले, सिध्देश पुलेकर, अश्विन विरकुड, विरेंद्र गायकर, श्वेता पालशेतकर, गौतमी पानवलकर आदिंसह महिलांसह शिवप्रेमी, शालेय व महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी ओंकार शाळा, मुरूड नगरपरिषद शाळा व सर एस ए हायस्कूलच्या ४२ विद्यार्थ्यांनी चित्रकला स्पर्धेत सहभागी नोंदवुन पद्मदुर्ग किल्ल्याचे चित्र काढुन शिवरायांना मानवंदना दिली.चित्रकार महेंद्र पाटील यांनी श्री शिवछत्रपतींची पाण्यात काढलेली रांगोळी विशेष आकर्षण ठरली.

अनिकेत पाटील यांनी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना गडाची व वास्तुंची माहिती दिली. पद्मदुर्गाचे ऐतिहासिक महत्व व इतिहास सर्वसामान्य पर्यटकांपर्यंत पोहोचवणे तसेच सामान्य नागरिकांनी पद्मदुर्गाचा इतिहास सांगून पोहोचवून रोजगारनिर्मिती व्हावी याकरिता गाईड प्रशिक्षण शिबीर आयोजित करण्यात आले होते. आप्पा परब यांनी भारताच्या वैभवशाली इतिहास, परकीय आक्रमण आणि राजे शिवछत्रपती महाराजांचा विजयी पराक्रमाचा इतिहास सांगण्यात आला.

दुर्गसंवर्धक आणि इतिहास विषयात मौल्यवान कामगिरी करणाऱ्या शिवप्रेमी आणि संस्थांचा सत्कार आप्पा परब, पंकज भोसले, सुधीर थोरात, विक्रम सिंह मोहिते व निलेश सरपाटील यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

निलेश सरपाटील यांनी लायजी पाटील यांनी जंजिरा स्वराज्यात येण्यासाठी केलेल्या कामगिरीची आठवण करून देत कार्यक्रमाची शोभा वाढवली. विक्रम सिंह मोहिते यांनी आरामाराचे महत्व या विषयावर मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमात विक्रमसिंह मोहिते, पद्मदुर्गचे आरामार अधिकारी लायजी सरपाटील यांचे वंशज निलेश सरपाटील तसेच अप्पासाहेब परब यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

### शिवशाही अवतरली

शिवप्रेमींनी गडाला फुलांच्या माळांनी व भगव्या सजवले होते. त्यामुळे शिवशाही अवतरली असा भास होत होता. प्रथम श्री कोटेश्वरी देवीची पुजा करुन महिलांच्या हस्ते देवीची ओटी भरुन पुजा करण्यात आली. तद्नंतर पद्मदुर्ग उभारणीच्या वेळी उभारण्यात आलेल्या मुहर्त मेढीच्या खांबाला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात उत्साहात करण्यात आली.

# निवडक

## काळभैरव काळसुरी 'ब' अजिंक्य

**म्हसळा :** मेंदडी कोंड येथे गावदेवी क्रीडा मंडळाच्या वतीने १८ जानेवारी २०२६ रोजी भव्य कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेला परिसरातील कबड्डीप्रेमी खेळाडू व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. संपन्न झालेल्या या कबड्डी स्पर्धेत काळभैरव काळसुरी ब संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला. अंतिम सामन्यात त्यांनी दमदार कामगिरी करत विजय मिळवला. सोमजाई माता खरसई संघाने द्वितीय क्रमांक, तर गावदेवी मेंदडी कोंड संघाने तृतीय क्रमांक आणि वेताळेश्वर मेंदडी संघाने चतुर्थ क्रमांक मिळवला. वैयक्तिक बक्षिसांमध्ये उत्कृष्ट पकड आदर्श पाटील (काळसुरी), उत्कृष्ट चढाई सन्मय घोसाळकर (काळसुरी), तर सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान सिद्धू काजारे (खरसई) यांना देण्यात आला. स्पर्धेच्या यशस्वी आयोजनाबद्दल गावदेवी क्रीडा मंडळाचे सर्वत्र कौतुक करण्यात येत असून, अशा स्पर्धांमुळे ग्रामीण भागातील युवकांना क्रीडा क्षेत्रात प्रोत्साहन मिळत असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

## १५ फेब्रुवारीला भारत-पाक २ सामने

**मुंबई :** भारत विरुद्ध पाकिस्तान या २ देशांच्या क्रिकेट संघात होणाऱ्या सामन्याची प्रतीक्षा असते. भारतात आणि श्रीलंकेत ७ फेब्रुवारीपासून आयसीसी टी २० वर्ल्ड कप २०२६ स्पर्धेचा थरार रंगणार आहे. या स्पर्धेदरम्यान इंडिया विरुद्ध पाकिस्तान यांच्यात महामुकाबला होणार आहे. हा सामना १५ फेब्रुवारीला होणार आहे. विशेष बाब म्हणजे १५ फेब्रुवारी या एकाच दिवशी भारत विरुद्ध पाकिस्तान यांच्यात २ सामने होणार आहेत. एसीसी अर्थात आशियाई क्रिकेट काउन्सिलने १९ जानेवारीला आशिया कप रायजिंग स्टार्स वूमन्स टी २० स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर केलं आहे. या स्पर्धेत एकूण ८ संघ भिडणार आहेत. या ८ संघांना ४-४ नुसार २ गटात विभागण्यात आलं आहे. या स्पर्धेचं आयोजन बँकॉक थायलंडमध्ये करण्यात आलं आहे. भारत ए आणि पाकिस्तान ए यांचा समावेश ए ग्रुपमध्ये करण्यात आला आहे. तसेच या ए ग्रुपमध्ये यूएई आणि नेपाळच्या प्रमुख संघाचा समावेश करण्यात आला आहे. बी ग्रुपमध्ये बांगलादेश श्रीलंकेच्या अ संघांचा समावेश करण्यात आला आहे. या ग्रुपमध्ये मलेशिया आणि यजमान थायलंडच्या मुख्य संघाचा समावेश आहे. या स्पर्धेत १३ ते १८ फेब्रुवारी दरम्यान साखळी फेरीचा थरार रंगणार आहे. साखळी फेरीत प्रत्येक संघाला ३ सामने खेळायचे आहेत. त्यानंतर दोन्ही गटातील अव्वल २ संघ उपांत्य फेरीसाठी पात्र ठरतील.



## इंग्लंडने झिम्बाब्वेला ८ विकेटने हरवले

**इंग्लंड :** अंडर-१९ पुरुष विश्वचषकात रविवारी ३ सामने खेळले गेले. इंग्लंडने झिम्बाब्वेचा ८ गडी राखून पराभव करत सलग दुसरा विजय मिळवला. २०१६ च्या विजेत्या वेस्ट इंडिजला अफगाणिस्तानकडून गट फेरीत पराभवाला सामोरे जावे लागले. न्यूझीलंड आणि अमेरिकेदरम्यानचा तिसरा सामना अनिर्णित राहिला. हरारे येथे यजमान संघ आणि इंग्लंड यांच्यात गट-क चा सामना खेळला गेला. प्रथम फलंदाजी करताना झिम्बाब्वेने ९ गडी गमावून २०८ धावा केल्या. कर्णधार सिम्बाराशे मुदुजेनगेरेने ४५, ततेंदा चिमुगोरोने ३०, ध्रुव पटेलने ३६ आणि कियान ब्लिग्नॉटने ३३ धावा केल्या. इंग्लंडकडून मॅनी लम्सडनने ३ बळी घेतले. राल्फी अल्बर्ट आणि फरहान अहमदला प्रत्येकी २ बळी मिळाले. ल्यूक हँड्स आणि ॲलेक्स फ्रेंचने प्रत्येकी १ बळी घेतला. २०९ धावांच्या लक्ष्यासमोर इंग्लंडने पहिल्या पॉवरप्लेमध्ये २ विकेट गमावल्या. बेन डॉकिन्स ११ आणि जोसेफ मूरेस १९ धावा काढून बाद झाले. बेन मेयर्स आणि कर्णधार थॉमस रीऊ यांनी पुन्हा शतकीय भागीदारी केली आणि २८ षटकांत संघाला विजय मिळवून दिला. रीऊ ८६ आणि मेयर्स ७७ धावांवर नाबाद राहिले.

## मुंबईत अर्ध मॅरेथॉनमध्ये गोंधळ

**मुंबई :** मुंबईतील अर्ध मॅरेथॉनमध्ये गोंधळ पाहायला मिळाला. पोलिस कप (करंडक) या अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी झालेल्या दिनकर महाले या खेळाडूला अर्ध मॅरेथॉनमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा मानकरी ठरवण्यात आले, पण काही वेळेनंतर संयोजकांच्या निदर्शनास आल्यानंतर त्याला क्रमवारीतून बाहेर काढण्यात आले. अर्ध मॅरेथॉनमधील पुरुष विभागात महाराष्ट्रातील मराठी खेळाडूंची धमक दिसून आली. आर्मीच्या गौरव माथूर याने सुवर्णपदक पटकावले असले तरी नाशिकच्या रमेश गवळी याने रौप्य व मुंबईच्या तन्मय पवार याने ब्राँझपदकाची कमाई केली. अर्ध मॅरेथॉन शर्यत संपल्यानंतर गौरव माथूर, दिनकर महाले व रमेश गवळी असे पहिले तीन क्रमांक समोर आले. काही कालावधीनंतर उडालेला गोंधळ संयोजकांना समजून आला. त्यानंतर दिनकर महाले याला बाहेर काढून बोरिवली येथे वास्तव्य असलेल्या तन्मय पवार याला तिसऱ्या स्थानावर बढती मिळाली. गौरव माथूर याने एक तास, सात मिनिटे व १८ सेकंदात शर्यत पूर्ण करीत सुवर्णपदक आपल्या नावावर केले. रमेश गवळी याने एक तास, ११ मिनिटे व ३२ सेकंदात शर्यत पूर्ण करीत रौप्यपदकावर हक्क सांगितला. तसेच तन्मय पवार याने एक तास, १२ मिनिटे व २७ सेकंदांत शर्यत पूर्ण करीत ब्राँझपदक पटकावले.महिला विभागातील अर्ध मॅरेथॉनमध्ये हरियानाच्या रीनू संधू हिने एक तास, १८ मिनिटे व दोन सेकंदात शर्यत पूर्ण करीत सुवर्णपदकाची कमाई केली. बंगळूरच्या प्रियांका सी. हिने एक तास, १९ मिनिटे व १३ सेकंदात शर्यत पूर्ण करीत रौप्यपदक जिंकले. उत्तराखंडच्या एकता रावत हिने एक तास, २३ मिनिटे व १९ सेकंदात शर्यत पूर्ण करीत ब्राँझपदक आपल्या नावावर केले.अर्ध मॅरेथॉनमध्ये दुसरा क्रमांक देण्यात आलेला दिनकर महाले याला पोलिस करंडकात दमदार यश संपादन करता आले. दिनकर महाले, पुंडलिक गवळी व अभिजित पाटील या तिघांनी मिळून या विभागात विजेता होण्यावर शिक्कामोर्तब केले.

# भारताने मालिका गमावली

- **विराटच झुंजार शतक व्यर्थ**
- **न्यूझीलंडचा विजय**

**। इंदूर। वृत्तसंस्था ।**

न्यूझीलंड क्रिकेट टीमने इतिहास घडवला आहे. न्यूझीलंडने टीम इंडिया विरूद्धच्या तिसऱ्या आणि अंतिम एकदिवसीय सामन्यात भारतावर ४१ धावांनी मात केली आहे. न्यूझीलंडने इंदूरमधील होळकर स्टेडियममध्ये भारतासमोर ३३८ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र भारताला या धावांचा पाठलाग करताना ५० षटकंही खेळता आली नाहीत.

न्यूझीलंडने भारताला २४ बॉलआधी ऑलआऊट केलं. न्यूझीलंडने भारताचा डाव ४६ षटकांत २९६ धावांवर गुंडाळला. विराट कोहली याने शतकी खेळी करत भारताच्या विजयाच्या आशा कायम ठेवल्या होत्या. मात्र विराट आऊट होताच भारताचा पराभव निश्चित झाला. न्यूझीलंडने त्यानंतर उर्वरित झटके देत भारताचा डाव आटोपला. न्यूझीलंडने यासह सामना जिंकला. न्यूझीलंडने अशाप्रकारे या मालिकेत एकूण आणि सलग दुसरा सामना जिंकला. न्यूझीलंडने या विजयासह ही ३ सामन्यांची मालिका २-१ अशा फरकाने आपल्या नावावर केली. तसेच न्यूझीलंडची ही भारतात एकदिवसीय मालिका जिंकण्याची पहिलीच वेळ ठरली. न्यूझीलंडने याआधी २०२४ साली भारताचा कसोटी मालिकेत ३-० ने धुव्वा उडवला होता.

भारताने न्यूझीलंडला टॉस जिंकून बॅटिंगसाठी भाग पाडलं. न्यूझीलंडला झटपट २ झटके दिले. त्यानंतर न्यूझीलंडच्या जोडीने तिसऱ्या विकेटसाठी अर्धशतकी भागीदारी केली. मात्र भारताने ही जोडी फोडली. मात्र त्यानंतर डॅरेल मिचेल आणि ग्लेन फिलिप्स या जोडीने चौथ्या विकेटसाठी द्विशतकी विक्रमी भागीदारी केली. त्यामुळे न्यूझीलंडला ३३० पार मजल मारता आली. डॅरेलने सर्वाधिक १३७ धावा केल्या. तर ग्लेनने १०६ धावांची खेळी साकारली. तसेच इतरांनीही योगदान दिलं. न्यूझीलंडने अशाप्रकारे ५० ओव्हरमध्ये ८ विकेट्स गमावून ३३७ धावा केल्या. भारतासाठी हर्षित राणा आणि अर्शदीप सिंह या दोघांनी प्रत्येकी ३-३ विकेट्स मिळवल्या.

त्यानंतर विराटने नितीश कुमार रेड्डी याच्यासह भारताचा डाव सावरला आणि भागीदारी उभारली. या दोघांनी पाचव्या विकेटसाठी ८८ बॉलमध्ये ८८ रन्सची पार्टरनशीप केली. नितीश आऊट होताच ही भागीदारी मोडीत निघाली. नितीशने ५३ धावांची खेळी केली. नितीशचं हे पहिलंवहिलं एकदिवसीय अर्धशतक ठरलं. ऑलराउंडर रवींद्र जडेजा याने पुन्हा एकदा बॅटिंगने निराशा केली. जडेजा १२ धावांवर माघारी परतला.

त्यानंतर मैदानात आलेल्या हर्षित राणा याने विराटला अप्रतिम साथ दिली. या दोघांच्या खेळीमुळे भारताच्या विजयाची आशा वाढली. तर न्यूझीलंडचं टेन्शन वाढलं. या दोघांनी चौफेर फटकेबाजी करत भारताला चांगल्या स्थितीत आणून ठेवलं.







**विराटनंतर त्यानंतर कुलदीप यादव याच्यासह भारताला विजयी करण्यासाठी प्रयत्न केले. विराटने मोठा फटका मारला आणि या प्रयत्नात तो कॅच आऊट झाला. विराट कोहली याने १०८ बॉलमध्ये १० फोर आणि ३ सिक्ससह १२४ धावांची खेळी केली. तर कुलदीप यादव आऊट होताच भारताचा डाव आटोपला आणि न्यूझीलंडने सामन्यासह मालिका आपल्या नावावर केली. क्रिस्टन क्लार्क आणि झॅक्री फाउल्क्स या दोघांनी प्रत्येकी ३-३ विकेट्स मिळवल्या. जेडेन लेनॉक्स याने भारताच्या दोघांना बाद केलं. तर इतरांनी चांगली साथ देत भारताला ऑलआउट करण्यात योगदान दिलं.**

## मुरूडच्या क्रीडाप्रेमींनी अनुभवली कबड्डीची चुरस

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

मराठी मातीतील कबड्डी हा खेळ आणि मुरूड तालुका यांचे नाते नेहमीच अभिमानास्पद राहिले असून, यंदाच्या तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्येही हीच परंपरा कायम ठेवण्यात आली असून, सामन्यांमध्ये प्रचंड चुरस पाहायला मिळाली. प्रत्येक सामना शेवटच्या क्षणापर्यंत रंगतदार ठरला. खेळाडूंच्या दमदार चढाया, बचावातील कौशल्य आणि जल्लोषाने भरलेले क्षण प्रेक्षकांसाठी पर्वणी ठरले.



मुरुड तालुक्यात नुकताच भारत सरकार अंतर्गत क्रीडा व युवा कार्यक्रम मंत्रालय संचालित मेरा भारत, रायगड आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या.

खेळाडूवृत्तीने संपन्न आलेल्या या उपक्रमामध्ये कबड्डी स्पर्धेत पुरुष गटामध्ये मुरूड पद्मदुर्ग संघाने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रथम क्रमांक पटकावला, तर संघर्ष मजगाव संघाने दमदार खेळ करत द्वितीय क्रमांक मिळवला. महिला गटातील खो-खो स्पर्धेमध्ये स्पर्धा विश्व अकॅडमी वॉरियर्स संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर प्रिझम रणरागिनी संघाने द्वितीय क्रमांक पटकावला.

गोळाफेक स्पर्धेत ऋतिक जेवले याने प्रथम , सुबोध पाटील याने द्वितीय आणि रोनक भायदे याने तृतीय क्रमांक मिळवला. गोळाफेक (महिला) स्पर्धेत संचिता सवतीकर हिने प्रथम क्रमांक, प्रियंका धोत्रे हिने द्वितीय आणि विना काकडे हिने तृतीय क्रमांक पटकावला.

४०० मीटर धावणे स्पर्धेत यश एकशिंगे याने प्रथम, सुबोध पाटील याने द्वितीय आणि ऋग्वेद बेलोशी याने तृतीय क्रमांक मिळवला. ४०० मीटर धावणे (महिला) स्पर्धेत छाया रायदास हिने प्रथम, नेहा महाडिक हिने द्वितीय आणि स्नेहा मानकर हिने तृतीय क्रमांक मिळवला. २०० मीटर धावणे (महिला) स्पर्धेत प्रणाली तळेगावकर हिने प्रथम, नेहा महाडिक हिने द्वितीय तर मधुरा दळवी हिने तृतीय क्रमांक मिळवून यश संपादन केले.

## ऋणमय गुरवने पटकावले सुवर्णपदक

**। सोगाव । प्रतिनिधी ।**

गोवा - मापसा येथे १३ वी राष्ट्रीय बेल्ट रेसलिंग आणि मास रेसलिंग स्पर्धा पार पडली. यामध्ये रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील थळ येथे राहणारा तसेच चिंतामणराव केळकर विद्यालय, अलिबाग या शाळेत पाचवी इयत्तेत शिकत असलेल्या ऋणमय गुरव या विद्यार्थ्याने महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करताना १० वर्षाखालील गटाच्या मुलांमध्ये झालेल्या स्पर्धेत सुवर्णपदक प्राप्त केले.

यामध्ये पहिल्या फेरीमध्ये हरियाणा दुसऱ्या फेरीमध्ये केरळ व अंतिम फेरीमध्ये गुजरात येथील प्रतिस्पर्ध्यांवर मात करत मैत्रीपूर्ण लढत दिली. यावेळी मेघालय राज्याचे मास्तर श्री संस्थेचे अध्यक्ष यांच्या हस्ते ऋणमय गुरव याला सुवर्णपदक प्रदान करण्यात आले. या स्पर्धेत संपूर्ण भारतातील २० राज्यातील ८०० हून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला होता. ऋणमय गुरव हा अलिबागमध्ये प्रशिक्षक संतोष कवळे व प्रशिक्षक रोहन गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.

**राष्ट्रीय बेल्ट रेसलिंग, मास रेसलिंग स्पर्धा**




## महाराष्ट्राच्या तरुणाचा न्यूझीलंडमध्ये डंका

**। पंढरपूर । वृत्तसंस्था ।**

कान्हापुरी (ता. पंढरपूर) येथील राहुल रघुनाथ भारती या तरुणाने न्युझीलंडमध्ये हॉर्स रेसिंग स्पर्धेत तब्बल २५ लाख रुपयांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस मिळवले आहे. ग्रामीण भागातील या तरुणाने सातासमुद्रापलीकडे जाऊन भारताचा डंका पेटला आहे. रेसिंग स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याची माहिती मिळताच येथील ग्रामस्थांनी फटाक्यांची आतषबाजी केली.

अवघ्या ३२ वर्षाच्या राहुल भारती या तरुणाला लहानपणापासूनच घोड्याच्या रेसिंग स्पर्धेविषयी खूप आकर्षण होते. पुणे येथे त्यांनी काही वर्षे प्रशिक्षण घेतल्यानंतर थेट न्युझीलंड गाठले. महाराष्ट्रात जसे बैलगाडी शर्यतीला मानाचे स्थान आहे. तसेच न्यूझीलंडमध्ये हॉर्स रेसिंग स्पर्धेला मोठी प्रतिष्ठा आहे.

हीच संधी साधून राहुल भारती या तरुणाने न्यूझीलंडमध्ये आपल्यातील कलागुण सिद्ध करून दाखवले आहेत. राहुल भारती यांचे वडील हे शेतकरी असून अत्यंत हालाखीच्या परिस्थितीमध्ये राहुल याने न्युझीलंडमध्ये जाऊन हॉर्स रेसिंग स्पर्धेत भारताचे नाव रोशन केले आहे. न्यूझीलंडमधील हॉर्स रेसिंग स्पर्धेमध्ये राहुल याने तब्बल २५ लाख रुपयांचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस पटकावले आहे.

त्याच्या या यशाची माहिती मिळताच कान्हापुरी गावामध्ये आनंदाला उधाण आले आहे. कान्हापुरीच्या मातीत जन्म घेतलेल्या या तरुणाने साता समुद्रा पलीकडे जाऊन आपल्या गावाचे नाव रोशन केल्याने येथील ग्रामस्थ आनंदित झाले आहेत.

राहुल भारती हा लहानपणापासूनच हरहुन्नरी आणि कष्टाळू आहे. त्याला घोड्याच्या शर्यतीविषयी खूप आकर्षण होते. त्याने पुण्यात जाऊन काही दिवस प्रशिक्षण घेतले. त्यानंतर तो गेल्या सहा वर्षांपासून याच क्षेत्रात न्युझीलंडमध्ये काम करत असल्याची माहिती त्यांच्या कुटुंबियांनी दिली. हॉर्स रेसिंग स्पर्धेच्या माध्यमातून राहुल याने देशाबरोबरच आपल्या गावाचे नाव मोठे केले आहे. याचा आम्हाला ग्रामस्थ म्हणून आम्हा अभिमान असल्याचे दयानंद शिंदे पाटील यांनी सांगितले.





## आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत सुवर्णपदक

**पंढरपूर :** मलेशिया येथे सुरू असलेल्या आंतरराष्ट्रीय कुस्ती स्पर्धेत किशोर पवार याने देशाला सुवर्णपदक मिळवून दिले आहे. मलेशिया येथे इंटरनॅशनल रेसलिंग चॅम्पियनशिप स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत ५७ किलो वजनी गटातून फ्री स्टाईल कुस्ती प्रकारात पैलवान किशोर पवार याने श्रीलंका, मलेशिया, थायलंड देशाच्या पैलवानांना धूळ चारत सूवर्णपदक पटकावले..पैलवान किशोर याचे आई - वडील हे शेती व्यवसाय सांभाळून कुस्ती खेळण्यासाठी प्रोत्साहन देतात. पैलवान किशोर हा कोल्हापूर येथील गंगावेश तालमीत.वस्ताद विश्वास हरगुले यांच्या मार्गदर्शनाखाली मल्लविद्येचा सराव करत आहे. भारतीय सेना प्रशिक्षक उत्तम पाटील यांचे मार्गदर्शन मिळत आहे.पैलवान किशोर पवार हा भोसे येथील यशवंतभाऊ पाटील महाविद्यालयात शिक्षण घेत आहे.



## कबड्डी स्पर्धेत वादळ खारिकवाडा संघाची हॅट्ट्रिक

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मजगावच्या आगरी समाज व नवतरुण मित्रमंडळाने प्रतिवर्षाप्रमाणे मकरसंक्रांत सणाच्या निमित्ताने आयोजित केलेल्या कबड्डी स्पर्धेत वादळ खारिकवाडा कबड्डी संघाने यावर्षीदेखील अंतिम सामन्यात विजयश्री मिळवून विजयाची हॅट्ट्रिक पूर्ण केली.गेली चाळीस वर्षांहून अधिक काळ सदर स्पर्धा येथे आयोजित केल्या जातात.

या कबड्डी स्पर्धेत एकूण ५२ संघ सहभागी झाले होते. वादळ खारिकवाडा संघासह मजगावचा भैरवनाथ संघ अंतिम फेरीत दाखल झाले होते.वादळ संघाने यावर्षीच्या विजयाने सलग तीन वर्षे प्रथम क्रमांक तर माजगावच्याच भैरवनाथ संघाला स्पर्धेत दुसरा क्रमांक मिळाला. मजगावचा फ्रेंड्स क्लब तिसऱ्या तर जय हनुमान मोरे गाव चौथ्या क्रमांकाचा मानकरी ठरला.त्यांना आकर्षक स्मृती चिन्हे व रोख रकमेचे धनादेश देऊन गौरविण्यात आले. वादळ संघाचा ओंकार मेस्त्री याला मालिकावीर व अंतिम सामन्यातील सामनावीर म्हणून निवडण्यात आले. उत्कृष्ट पकडपटू म्हणून दीपेश गिरणेकर तर उत्कृष्ट बचावपटू म्हणून दिनेश गाणार यांची निवड करण्यात आली.

**विजय हजारे ट्रॉफी स्पर्धा | फायनलमध्ये सौराष्ट्रचा धुव्वा**

# विदर्भ संघ ठरला नवा चॅम्पियन

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

विदर्भाच्या पोट्ट्यांचे गेल्या स्पर्धेत चॅम्पियन होण्याचं स्वप्न भंगलं होतं. तेव्हा विदर्भाला अंतिम सामन्यात कर्नाटक विरुद्ध पराभूत व्हावं लागलं होतं. त्यामुळे विदर्भाला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं होतं. मात्र पोट्ट्यांनी पराभवामुळे खूचून न जाता जोरदार मुसंडी मारली. विदर्भ क्रिकेट टीमने हर्ष दुबे याच्या नेतृत्वात ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

विदर्भाने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील २०२५-२०२६ या मोसमातील अंतिम सामन्यात सौराष्ट्रचा धुव्वा उडवला आहे. विदर्भ यासह विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेतील चॅम्पियन ठरली आहे. विदर्भाची ही ट्रॉफी जिंकण्याची पहिलीच वेळ ठरली आहे.




ओपनर अथर्व तायडे याने केलेल्या शतकाच्या जोरावर विदर्भाने सौराष्ट्रसमोर ३१८ धावांचं आव्हान ठेवलं होतं. मात्र सौराष्ट्रला विजयी धावांचा पाठलाग करताना संपूर्ण ५० षटकंही खेळता आलं नाही. विदर्भाने सौराष्ट्रला ७ बॉल आणि ३८ धावांआधी रोखलं. विदर्भाच्या गोलंदाजांनी सौराष्ट्रचं ४८.५ ओव्हरमध्ये २७९ धावांवर पॅकअप केलं. विदर्भाने अशाप्रकारे विजय हजारे करंडकावर आपलं नाव कोरलं. तर सौराष्ट्रला उपविजेतापदावर समाधान मानावं लागलं. सौराष्ट्रने महाअंतिम सामन्यात नाणेफेक जिंकून विदर्भाला बॅटिंगसाठी भाग पाडलं. विदर्भ टीमने या संधीचा फायदा घेत ३०० पार मजल मारली. विदर्भाने ५० ओव्हरमध्ये ८ विकेट्स गमावून ३१७ धावा केल्या. अथर्व तायडे याने केलेल्या शतकी खेळीमुळे विदर्भाला ३०० पार पोहचता आलं. अथर्वने विदर्भासाठी सर्वाधिक धावांचं योगदान दिलं. अथर्वने ११८ चेंडूंमध्ये १२८ धावांची खेळी केली. अथर्वने या खेळीत १५ चौकार आणि ३ षटकार लगावले. तसेच विदर्भाचा स्टार अमन मोखाडे याने ३३ धावांचं योगदान दिलं. यश राठोड याने ५४ धावांच खेळी साकरली. तर रवीकुमार समर्थ याने २५ धावा केल्या. सौराष्ट्रसाठी अंकुर पंवार याने विदर्भाच्या ४ फलंदाजांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. चेतन सकारिया आणि चिराज जानी या दोघांनी प्रत्येकी २-२ विकेट्स मिळवल्या.

### सौराष्ट्रची बॅटिंग

**सौराष्ट्रला विजयी धावांचा पाठलाग करताना खास सुरुवात करता आली नाही. विश्वराज जडेजा आणि हरविक देसाई झटपट बाद झाले. प्रेरक मंकड याने ८८ धावांची खेळी केल. सौराष्ट्रच्या विजयाची आशा कायम होती. चिराग जानी याने ही ६४ धावा जोडल्या. विदर्भाच्या गोलंदाजांनी आपली धार कायम ठेवली. कर्णधार हर्ष दुबेल याने विकेट घेत मॅच फिरवली. त्यामुळे सौराष्ट्रचं ४८.५ ओव्हरमध्ये २७९ धावांवर पॅकअप झाले. विदर्भासाठी यश ठाकूर याने सर्वाधिक ४ विकेट्स मिळवल्या. तर नचिकेत भुते याने ३ विकेट्स घेतल्या. दर्शन नळकांडे याने २ फलंदाजांना मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)